घड्याळ म्हंटल की..
विठ्ठल वॉच
नामवंत कंपन्यांची घड्याळे
मिळतील विक्री व दुरूस्ती
सुधाकर कॉम्पलेक्स,नगरपलिकेसमोर
मायणी रोड,विटा (जि.सांगली)
८२६२८३५३९१-९४२१२२१६३०

# प्रीतिसंगम

www.pritisangam.com
सातारा-सांगली-कोल्हापूर-पुणे-सोलापूर

प्रीतिसंगम आता आहे डिजिटल!
प्रीतिसंगम आता गुगलवर उपलब्ध!
'प्रीतिसंगम वर्तमानपत्र' शोधा | www.pritisangam.com
दैनंदिन अपडेट्स, बातम्या, विश्लेषण आणि बरेच काही, कधीही, कुठेही पहा! आत्ताच भेट द्या!
गुगलवर 'प्रीतिसंगम' शोधा आणि बातम्यांचा आनंद घ्या!
• ई-पेपर प्रवेश • थेट अपडेट्स • २४x७ कव्हरेज • प्रादेशिक आणि जागतिक बातम्या
www.pritisangam.com

वर्ष ३० वे | अंक १६४ | पाने ४ | किंमत २ रूपये | बुधवार १४ ऑक्टोबर २०२६ | R.N.I.No.MAHMAR./2001/10338 | पोस्ट परवाना No./KRDDN/008/2024-2026 | फोन-२२७७२५

# सणांच्या तोंडावर महागाईचा भडका

## सर्व सामान्यांचे बजेट कोलमडले:सर्वच वस्तूंच्या किमतीत वाढ

**मुंबई/प्रतिनिधी:-**

**गेल्या वर्षभरात महाईचा भडका उडाला असून, कांद्यापासून ते साखरेपर्यंत सर्वच वस्तूंच्या किमतीत सातत्याने वाढ झाल्याने दसरा-दिवाळीच्या तोंडावर महागाईच्या झळा सर्वसामान्यांना बसत आहेत. अशातच महाराष्ट्रातील दुष्काळ परिस्थितीत आणखी वस्तू महागण्याची भीती व्यक्त करण्यात येत आहे. तांदूळ- गहूच्या किमतीत सातत्याने वाढ सुरु आहे यामुळे सर्वांचेच बजेट कोलमडले असून किरकोळ महागाईचा दर ५.५% पर्यंत पोहचला असून अन्नपदार्थांच्या वाढत्या किमती हे त्याचे मुख्य कारण ठरत आहेत. अन्न धान्याचा दर ७.७४% इतका नोंदवला गेला आहे.**



सरकारकडून देखरेख केल्या जाणाऱ्या ४२ जीवनावश्यक वस्तूंपैकी ४१ वस्तूंच्या किरकोळ किंमतीत गेल्या वर्षभरात वाढ झाली आहे. केवळ बटाटा हा याला अपवाद ठरला आहे. ग्राहक व्यवहार विभागाच्या किंमत-देखरेख आकडेवारीनुसार, कांद्याच्या किमतीत सर्वाधिक सुमारे ११३% वाढ झाली आहे. त्यानंतर साखर (सुमारे २२%) आणि सूर्यफूल तेल (सुमारे १८%) यांचा क्रमांक लागतो.सांख्यिकी मंत्रालयाने सोमवारी जाहीर केलेल्या अधिकृत आकडेवारीवरून असे दिसून येते की, सप्टेंबरमध्ये किरकोळ महागाईचा दर ५.५% (गेल्या दोन वर्षांतील उच्चांक) पर्यंत पोहोचण्यामागे अन्नपदार्थांच्या वाढत्या किमती हे एक प्रमुख कारण होते. या महिन्यासाठी वार्षिक अन्नधान्य महागाईचा दर ७.७४% इतका नोंदवला गेला.

विविध वस्तूंच्या श्रेणींमधील अधिकृत आकडेवारीवरून असे दिसून येते की, कडधान्यांमध्ये 'तूर डाळी'च्या सरासरी किरकोळ किमतीत सर्वाधिक वाढ झाली आहे. सोमवारी तिचा दर प्रति किलो सुमारे १२९ रुपयांवर पोहोचला, जो वर्षभरापूर्वी ११३ रुपये होता. चार प्रमुख महानगरांमध्ये हे दर अधिक होते आणि ते प्रति किलो १४० ते १४५ रुपयांच्या दरम्यान होते. 'चना डाळी'ची सरासरी किंमत ६.४% ने वाढून सोमवारी प्रति किलो ९१ रुपये झाली, जी वर्षभरापूर्वी ८५ रुपये होती.



पुणे-बेंगलोर राष्ट्रीय महामार्गावरील कोगनोळी टोल नाक्यावर ऊस दरासाठी राजू शेट्टी यांच्या नेतृत्वाखाली हजारो शेतकरी रस्त्यावर ठिय्या मारून बसले आहेत.

# आ.पडळकरांना धक्का;जिल्हा बँकेचा अर्ज अवैध

## कोल्हापूर सर्किट बेंचचा निर्णय

**सांगली/प्रतिनिधी:-**

जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या निवडणुकीत संचालक होण्यासाठी आमदार गोपीचंड पडळकरांनी काही महिन्यांपासून जोरदार तयारी केली होती. जत 'अ' सोसायटी गटातून आमदार पडळकर यांचा उमेदवारी अर्ज अवैध ठरल्याने त्यांना मोठा राजकीय धक्का बसला आहे. कोल्हापूर सर्किट बेंचने याचिकाकर्त्यांची हरकत ग्राह्य धरत आमदार पडळकरांनी दाखल केलेले कागदपत्र आणि पुरावे चुकीचे असल्याचे स्पष्ट करत त्यांचा अर्ज अवैध ठरवला.

जिल्हा बँकेच्या निवडणुकीत संचालक होण्यासाठी आमदार पडळकरांनी गेल्या काही महिन्यांपासून जोरदार तयारी केली होती. बँकेच्या कारभारावर जोरदार आरोप करीत त्यांनी रान उठवले होते. बँकेने भरती जाहीर केल्यानंतर त्यांनी सरकारकडून दबाव आणून या भरतीला स्थगिती आणली होती. तसेच बँकेच्या आजी-माजी संचालकांनी गैरकारभार केल्याचा



आरोप करीत सरकारला निवृत्त

पान २ वर

### जिल्हा बँकेच्या २१ जागांसाठी ३०० च्या वर अर्ज

सांगली जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या पंचवार्षिक निवडणुकीसाठी अर्ज दाखल करण्याच्या अखेरच्या दिवशी उमेदवारांचा अभूतपूर्व उत्साह पाहायला मिळाला. गुरुवारी शेवटच्या दिवशी एकाच दिवशी १४७ उमेदवारांनी अर्ज दाखल केले. यामुळे बँकेच्या एकूण २१ संचालक पदांच्या जागांसाठी तब्बल ३०० च्या वर उमेदवारी अर्ज दाखल झाले. ही निवडणूक कमालीची रंजक ठरणार असल्याचे स्पष्ट झाले आहे.

# ऊस दरासाठी राजू शेट्टींचे शेतकऱ्यांसह धरणे आंदोलन

**कोल्हापूर/प्रतिनिधी:-**

साखरेचा किमान हमीभाव आणि इथेनॉल दराबाबत नवी दिल्लीत केंद्र सरकारसोबत झालेली महत्त्वाची बैठक निष्फळ ठरल्यामुळे, स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे नेते माजी खासदार राजू शेट्टी यांच्या नेतृत्वाखाली आज सकाळी ११ वाजल्यापासून पुणे-बेंगलोर राष्ट्रीय महामार्गावर हजारो शेतकऱ्यांनी बेमुदत धरणे आंदोलन सुरू केले आहे. कर्नाटक व महाराष्ट्राच्या सीमेवरील कोगनोळी टोल नाका आणि कर्नाटक येथील हत्तरकी टोल नाका येथे हजारो शेतकऱ्यांनी ठिय्या आंदोलन मांडल्याने हा प्रमुख महामार्ग पूर्णपणे बंद झाला आहे. या अचानक झालेल्या आंदोलनामुळे महाराष्ट्र आणि कर्नाटक दोन्ही राज्यांचे पोलीस प्रशासन कमालीचे धास्तावले आहे.

काल नवी दिल्ली येथे केंद्र सरकारचे प्रतिनिधी आणि शेतकरी नेत्यांमध्ये साखर आणि इथेनॉलच्या दराबाबत महत्त्वाची बैठक पार पडली. या बैठकीत शेतकऱ्यांच्या प्रमुख तीन मागण्यांवर चर्चा झाली.यामध्ये साखरेचा किमान हमीभाव (चड्झ) प्रतिकिलो ५० रुपये करावा, सी-हेव्ही इथेनॉलचा दर प्रतिलिटर ७० रुपये करावा ,केंद्र सरकारच्या निर्देशानुसार साखर हंगाम लवकर सुरू केल्यामुळे शेतकऱ्यांना प्रतिटन ५०० रुपये अनुदान द्यावे.

मात्र, केंद्र सरकारकडून या मागण्यांवर कोणताही सकारात्मक निर्णय न झाल्याने ही बैठक पूर्णपणे निष्फळ ठरली. याच्या निषेधार्थ राजू शेट्टी यांनी आज थेट दोन्ही राज्यांच्या सीमांवर आरपारच्या लढाईची घोषणा केली.

आंदोलनाची माहिती मिळताच दोन्ही राज्यांच्या पोलिसांनी कोगनोळी टोल नाक्यांकडे धाव घेतली. महामार्गावर वाहनांच्या लांबच लांब रांगा लागल्याने पोलिसांनी तात्काळ वाहतूक रोखून ती अंतर्गत ग्रामीण व पर्यायी मार्गांनी वळवण्यास सुरुवात केली आहे. सुरक्षेचा उपाय म्हणून पुणे-बेंगलोर महामार्ग सध्या बंद ठेवण्यात आला असून प्रवाशांना पर्यायी मार्गांचा वापर करण्याचे आवाहन प्रशासनाने केले आहे.

जोपर्यंत केंद्र सरकार मागण्यांचा लेखी निर्णय जाहीर करत नाही, तोपर्यंत महामार्ग एक इंचही मोकळा केला जाणार नाही, असा इशारा राजू शेट्टी यांनी दिला आहे. शेतकऱ्यांनी आंदोलनाच्या ठिकाणीच मुक्काम ठोकण्याची तयारी केली आहे. कागल आणि निपाणी तालुक्यातील गावांमधून शेतकऱ्यांसाठी भाकरी आणि पिठलं गोळा केले जात असून, टोल नाक्यावरच सामूहिक जेवणाची व्यवस्था करण्यात येत आहे. आंदोलनाला आता एका मोठ्या छावणीचे स्वरूप आले आहे.

# बुलेटच्या धडकेत महिलेचा मृत्यू

**कराड/प्रतिनिधी:-**

कराड-शेडगेवाडी मार्गावरील नांदगाव बसथांब्याजवळ भरधाव बुलेट दुचाकीने धडक दिल्याने गंभीर जखमी झालेल्या ५८ वर्षीय महिलेचा उपचारादरम्यान मृत्यू झाला.

कुसूम निवास काटरे असे मृत महिलेचे नाव असून, ३ ऑक्टोबर रोजी झालेल्या या अपघातप्रकरणी प्रणव प्रकाश थोरात (रा. सवादे, ता. कराड) याच्याविरुद्ध कराड ग्रामीण पोलिसांत तक्रार दाखल करण्यात आली आहे. अपघातानंतर जखमी महिलेला मदत न करता आणि पोलिसांना माहिती न देता दुचाकीस्वार निघून गेल्याचा आरोप तक्रारीत करण्यात आला आहे.

याबाबत पोलिसांकडून मिळालेली माहिती अशी की, कुसूम काटरे या ३ ऑक्टोबर रोजी मनव येथे देवदर्शनासाठी गेल्या होत्या. देवदर्शन करून त्या नांदगाव बसथांब्याजवळ आल्या असताना सायंकाळी सुमारे ५.४२ वाजता कराडहून उंडाळेच्या दिशेने जाणाऱ्या बुलेट दुचाकीने त्यांना जोराची धडक दिली. या अपघातात त्यांच्या डोक्याला आणि पायाला गंभीर दुखापत झाली.

# कारंडवाडीत तरुणाच्या दिशेने गोळीबार

## बसस्थानक परिसरात रात्री थरार; पिस्तूल दाखवून जीवे मारण्याची धमकी दिल्याचा आरोप

**सातारा/प्रतिनिधी:-**

कारंडवाडी (ता. सातारा) येथील बसस्थानक परिसरात तरुणाच्या दिशेने पिस्तुलातून गोळी झाडल्याच्या घटनेने सोमवारी रात्री परिसरात खळबळ उडाली. ऋषिकेश संतोष माने (वय २८) यांच्यावर गोळीबार करून जीवे मारण्याचा प्रयत्न केल्याचा आरोप महेश जालिंदर माने याच्यावर आहे. घटनेनंतर ग्रामस्थांनी प्रसंगावधान राखत संशयिताला पकडून पोलिसांच्या ताब्यात दिले.

याप्रकरणी ऋषिकेश माने यांनी सातारा तालुका पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे.

त्यानुसार, सोमवारी (दि. १२) रात्री साडेदहाच्या सुमारास ऋषिकेश माने हे मित्रांसोबत जेवण झाल्यानंतर कारंडवाडी बसस्थानक परिसरात गप्पा मारत चालले होते. त्यावेळी महेश माने हा बुलेट दुचाकीसह रस्त्यावर उभा होता.

मित्रांसह जात असलेल्या ऋषिकेश यांना पाहून संशयिताने त्यांच्याशी वाद घातल्याचे फिर्यादीत नमूद आहे. वादाचे रूपांतर शिवीगाळ आणि दमदाटीत झाले. त्यानंतर संशयिताने कमरेला लावलेले पिस्तूल काढून 'तुला जिवंत सोडणार नाही,' अशी धमकी दिली आणि ऋषिकेश यांच्या दिशेने गोळी झाडल्याचा आरोप आहे.

पान ३ वर

## चेनस्नॅचिंग प्रकरणी अज्ञातावर गुन्हा

**सातारा/प्रतिनिधी:-**

चेनस्नॅचिंग प्रकरणी अज्ञाताविरोधात सातारा शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत पोलिसांनी दिलेली माहिती अशी, दि. ६ रोजी सातारा शहरातील सदर बाजार परिसरातून जाताना स्प्लेंडर मोटर सायकल वरून आलेल्या एका अज्ञाताने एका महिलेचे चार ग्रॅम वजनाचे मंगळसूत्र हिसकावून पोबारा केला आहे. याप्रकरणी सातारा शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास महिला पोलीस उपनिरीक्षक जैस्वाल करीत आहेत.

## किरकोळ कारणावरून दांम्पत्यास मारहाण

**सातारा/प्रतिनिधी:-**

पिरवाडी येथे किरकोळ कारणावरून दाम्पत्यास मारहाण केल्याप्रकरणी चार जणांविरोधात सातारा शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत पोलिसांनी दिलेली माहिती अशी दिनांक ९ रोजी रात्री नऊ वाजण्याच्या सुमारास पिरवाडी गोरखपूर येथे पदम हरीश विश्वकर्मा व त्याच्या पत्नीस किरकोळ कारणावरून मारहाण केल्याप्रकरणी वीरेंद्र विश्वकर्मा, डिल्ली विश्वकर्मा, खकेंद्र विश्वकर्मा, कमल विश्वकर्मा सर्व रा. सातारा यांच्या विरोधात सातारा शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास पोलीस हवालदार देशमुख करीत आहेत.

# कामेरीच्या घरफोडीचा उलगडा

## स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखा व ईश्वरपूर पोलिसांची संयुक्त कारवाई:१०.६७ लाखाचा मुद्देमाल जप्त

**ईश्वरपूर/प्रतिनिधी:-**

ईश्वरपूर पोलिस ठाण्याच्या हद्दीतील कामेरी येथे घरफोडी करून सोन्या-चांदीचे दागिने व रोख रक्कम चोरणाऱ्या सराईत गुन्हेगाराला अटक करण्यात स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखा आणि ईश्वरपूर पोलिसांना यश आले आहे. प्रवीण राजा शिंदे (वय ३५, रा. गणेशवाडी रोड, वडूज, जि. सातारा) असे अटक केलेल्या आरोपीचे नाव आहे.त्याला न्यायालयाने १६ ऑक्टोबर पर्यत पोलीस कोठडी सुनावली आहे.

त्याच्याकडून दोन लोखंडी कटावण्या, रोख रक्कम आणि सोन्या-चांदीचे दागिने असा एकूण १० लाख ६७ हजार ५५० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. या गुन्ह्यातील



अन्य दोन संशयित आर्यन कान्हा काळे व अजय बाळासाहेब शिंदे (दोघेही रा. फडताडवाडी, ता. खटाव, जि. सातारा) यांचा पोलिस शोध घेत आहेत.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, ११ सप्टेंबरला रात्री १२.३० ते पहाटे ५ वाजण्याच्या दरम्यान कामेरी (ता. वाळवा) येथील संतोष खाशाबा परीट बाबू आंधळे, उज्वला जाधव, विजय पाटील, सारिका सोनावले या नागरिकांच्या घरांच्या दरवाजांचे कडी-कोयंडे उचकटून अज्ञात चोरट्यांनी सोन्या-चांदीचे दागिने आणि रोख रक्कम चोरून नेली होती. पान ४ वर

# दुष्काळाच्या पार्श्वभूमीवर सातारा पालिकेचे पाणी बचतीचे नियोजन

**सातारा/प्रतिनिधी:-**

जिल्ह्यातील दुष्काळी परिस्थिती आणि जिल्हा प्रशासनाने पाणी बचतीसाठी दिलेल्या दहा टक्के पाणीकपातीच्या आदेशाच्या पार्श्वभूमीवर सातारा नगरपालिकेने पाणीपुरवठ्याच्या नियोजनासाठी हालचाली सुरू केल्या आहेत. उपलब्ध पाणीसाठ्याचा काटकसरीने वापर, पाणीपुरवठा यंत्रणेतील गळती रोखणे आणि आगामी उन्हाळ्यातील संभाव्य पाणीटंचाईवर मात करण्यासाठी सातारा नगरपालिकेत नियोजन बैठक घेण्यात आली.

नगराध्यक्ष अमोल मोहिते आणि उपनगराध्यक्ष ड. दत्ताजी बनकर मुख्याधिकारी विनोद जळक



पाणी पुरवठा अभियंता शहाजी वाठारे यांच्यासह महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचे अधिकारी घंटेवारी करणारे कर्मचारी उपस्थित होते. शहरातील पाणीटंचाईची सद्यस्थिती, उपलब्ध पाणीस्त्रोतांचा योग्य वापर, पाणीपुरवठा योजनांची कार्यक्षमता आणि दुरुस्तीची कामे यावर बैठकीत चर्चा करण्यात आली.

पान ३ वर

## मन..

मन अस्वस्थविषण्ण
मागे बोले कोणकाय
कान नाहीत पाठीला
होतो भारी निरूपाय
नजरमिळवे नजरेला
उगाचं बिथरुन जाय
कशी चाले वाटचाल
लट पट करतात पाय
अनोळखी दिसो जरी
म्हणतोय रे हॅलो हाय
लाळघोट करती सारे
कुठेजरीही दिसे साय
स्पोटक मुख उघडता
देवून टाक अलर्टहाय
वाचाळ जीभ बहकते
काढून टाके आयमाय
जिव्हाबोले आपत्तीले
दे गं माय धरणीतठाय
स्व निर्मीत संकट सारे
रडत बसे मोकलू धाय
जपून वापरावे शब्द रे
संकटे आणे महाकाय
उगाच बोलून बसलोय
मन स्वतास खातजाय
डोक्या सर्वोच्च स्थान
राहते तिथे बुध्दी माय
शरीरामिळे मंदिरदर्जा
जमिनीवर ज्यांचे पाय

**- हेमंत मुसरीफ पुणे**
**९७३०३०६९९६**

# चार दिवसांतच विद्यानगरमध्ये अतिक्रमणांचे पुनरागमन!

## वाहतूक कोंडीचा धोका; ग्रामपंचायतीची कारवाई निष्प्रभ, सार्वजनिक बांधकाम विभागाच्या भूमिकेवर प्रश्नचिन्ह

**कराड/प्रतिनिधी:-**

विद्यानगर परिसरातील रस्त्यांवरील अतिक्रमण हटविण्याची सैदापूर ग्रामपंचायतीची मोहीम अवघ्या चार दिवसांतच निष्प्रभ ठरल्याचे चित्र समोर आले आहे. कारवाईनंतर हटविण्यात आलेल्या जागांवर पुन्हा खाद्यगाड्या उभ्या राहिल्याने अतिक्रमणधारकांना प्रशासनाचा धाक उरला आहे की नाही, असा प्रश्न उपस्थित होत आहे. या प्रकारामुळे वाहतुकीचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला असून, विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेबाबतही चिंता व्यक्त केली जात आहे.

### नियमित देखरेख ठेवावी

विद्यानगर परिसरातील वाहतूक सुरळीत ठेवण्यासाठी आणि विद्यार्थ्यांची सुरक्षितता सुनिश्चित करण्यासाठी या ठिकाणी नियमित देखरेख ठेवावी. गरजेनुसार पोलीस बंदोबस्त उपलब्ध करून देत अतिक्रमण पुन्हा होणार नाही, याची दक्षता घ्यावी. अन्यथा, दरवेळी कारवाई आणि त्यानंतर पुन्हा अतिक्रमण, हेच चक्र सुरू राहण्याची भीती नागरिक व्यक्त करत आहेत.




विद्यानगर महाविद्यालय परिसरातील रस्त्यांच्या दुतर्फा खाद्यपदार्थांच्या हातगाड्या आणि जंक फूड विक्रेत्यांनी ठाण मांडल्याने वाहतुकीला अडथळे निर्माण होत होते. विद्यार्थ्यांची वर्दळ असलेल्या या परिसरात वाहतूक कोंडी आणि अपघातांचा धोका वाढल्याने नागरिकांकडून अतिक्रमण हटविण्याची मागणी होत होती. त्याची दखल घेत सैदापूर ग्रामपंचायतीने नोटिसा बजावून अतिक्रमण हटविण्याची मोहीम राबविली. मात्र, या कारवाईनंतर परिस्थितीत कायमस्वरूपी सुधारणा होण्याऐवजी अवघ्या चार दिवसांत पुन्हा खाद्यगाड्या उभ्या राहिल्या आहेत.

### ठोस भूमिका घेण्याची गरज

या रस्त्याचा संबंधित भाग सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अखत्यारीत येत असल्याने अतिक्रमण रोखण्यासाठी या विभागानेही ठोस भूमिका घेण्याची गरज आहे. ग्रामपंचायतीच्या कारवाईपुरते मर्यादित न राहता संबंधित यंत्रणांनी संयुक्त मोहीम राबवून अतिक्रमणांवर कायमस्वरूपी उपाययोजना कराव्यात, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे. अतिक्रमणांना वारंवार संधी मिळत असल्याने संबंधित विभागांच्या कार्यपद्धतीबाबतही प्रश्न उपस्थित केले जात आहेत.

कारवाईनंतरही परिस्थिती जैसे थेअतिक्रमण हटविण्याची मोहीम केवळ तात्पुरती ठरणार असेल, तर त्याचा उपयोग काय, असा सवाल नागरिक उपस्थित करत आहेत.अतिक्रमणधारकांवर सातत्याने देखरेख ठेवणे आणि पुन्हा अतिक्रमण होणार नाही, याची खबरदारी घेणे आवश्यक असताना प्रत्यक्षात परिस्थिती पूर्वपदावर येत असल्याचे दिसत आहे. त्यामुळे ग्रामपंचायतीच्या कारवाईनंतरही अतिक्रमणाचा प्रश्न कायम असल्याचे स्पष्ट होत आहे.

# ज्ञानेश यांचा राजीनामा हे आमचे मिशन:राहुल गांधी

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था:-**

गेल्या काही दिवसांपासून निवडणूक आयोग आणि मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांच्याविरोधात वातावरण तापले आहे. विविध आघाड्यांवर त्यांच्याविरोधात आंदोलने केली जात आहेत. त्याचदरम्यान, काल विरोधकांच्या इंडिया आघाडीनेज्ञानेश कुमारांविरोधात याचिका दाखल केली. त्यानंतर आज एकत्रित चहापान केल्यानंतर संयुक्त पत्रकार परिषद घेतली आणि आंदोलनाची दिशा स्पष्ट केली. राहुल गांधी यांच्या नेतृत्वाखाली इंडिया आघाडी एकजुटीने आंदोलन करेल, असे पत्रकार परिषदेत सांगण्यात आले.

लोकशाहीत आपली नाराजी व्यक्त करण्याचा एकमेव मार्ग जंतर मंतर होता आणि आता सरकारने ठरवले आहे की लोकशाही भावना व्यक्त करण्यासाठी जंतर मंतरचा वापर यापुढे करता येणार नाही. आम्ही या विचाराला आव्हान देणार आहोत. भारतीय जनता आपल्या आवाजासाठी लढणार नाही, असा निर्णय घेणे सरकारसाठी इतके सोपे असणार नाही. ज्या लोकांनी हे केले आहे, त्यांनी हे समजून घेतले पाहिजे की त्यांच्याभोवतीचा फास आवळत चालला आहे. तुम्ही भारतीय संविधान नष्ट करून सहज बदल करू शकाल असे तुम्हाला वाटत असेल तर इतके सोपे असणार नाही, असा इशारा राहुल गांधी यांनी दिला.

# संपादकीय

## बांगलादेशी जनतेचा रोष

परदेश दौऱ्यावर गेलेल्या एखाद्या माजी सत्ताप्रमुखाला त्याच्याच देशातील अनिवासी नागरिकांनी घेरून देशातील अशांततेबद्दल जाब विचारणे, ही केवळ एका व्यक्तीविरोधातील नाराजीची घटना मानता येणार नाही. त्यामागे आपल्या देशातील राजकीय घडामोडींबद्दलची चिंता, लोकशाही व्यवस्थेविषयीच्या अपेक्षा आणि राष्ट्रीय स्थैर्याबद्दलची आस्था दडलेली असू शकते. बांगलादेशचे माजी हंगामी सरकारप्रमुख आणि नोबेल पारितोषिक विजेते मोहम्मद युनूस यांना न्यूयॉर्कमधील जॉन एफ. केनेडी आंतरराष्ट्रीय विमानतळावर अनिवासी बांगलादेशी नागरिकांच्या संतापाचा सामना करावा लागल्याची घटना याच संदर्भात महत्त्वाची ठरते. एक्स फ्लॅटफॉर्मवरील तुफानी युजरने एका व्हायरल व्हिडिओनुसार, विमानतळावर उपस्थित असलेल्या काही नागरिकांनी युनूस यांच्याविरोधात घोषणाबाजी केली. बांगलादेशातील हिंसाचार आणि अस्थैर्यासाठी त्यांच्या प्रशासनाला जबाबदार धरत त्यांनी तीव्र नाराजी व्यक्त केली. काही आंदोलकांनी त्यांच्यावर गंभीर आरोपही केले. मात्र, या आरोपांची सत्यता तपासण्यासाठी स्वतंत्र चौकशी, अधिकृत नोंदी आणि विश्वसनीय पुरावे आवश्यक आहेत. तरीही, देशाबाहेर राहणाऱ्या नागरिकांच्या मनात आपल्या देशाच्या राजकीय परिस्थितीबद्दल किती अस्वस्थता असू शकते, याचा विचार करण्यास ही घटना भाग पाडते.

बांगलादेशातील राजकीय अस्थैर्य समजून घेताना ऑगस्ट २०२४ मधील सत्तांतराकडे दुर्लक्ष करता येणार नाही. तत्कालीन पंतप्रधान शेख हसीना यांच्याविरोधात विद्यार्थ्यांच्या आंदोलनातून सुरू झालेला संघर्ष व्यापक जनआंदोलनात परिवर्तित झाला. त्यानंतर सत्तांतर होऊन मोहम्मद युनूस यांच्या नेतृत्वाखाली हंगामी सरकार स्थापन झाले. मात्र, सत्तांतरानंतर शांतता प्रस्थापित करणे, कायदा-सुव्यवस्था राखणे आणि हिंसाचाराला आळा घालणे ही नव्या प्रशासनापुढील मोठी आव्हाने होती. पण युनूस सरकारने त्या आव्हानांवर मात केली नाही. राजकीय संक्रमणाच्या काळात नागरिकांच्या सुरक्षेची हमी देणे, अल्पसंख्याकांचे संरक्षण करणे, पोलिसांसह सर्व सार्वजनिक यंत्रणांचे कामकाज पूर्ववत करणे आणि हिंसक घटनांची निष्पक्ष चौकशी करणे ही सरकारची मूलभूत कर्तव्ये असतात. या जबाबदाऱ्यांमध्ये त्रुटी राहिल्यास जनतेच्या मनात अविश्वास निर्माण होणे स्वाभाविक आहे. बांगलादेशात सत्तांतरानंतर हिंसाचार, पोलिसांवरील हल्ले आणि हिंदूसह धार्मिक अल्पसंख्याकांच्या सुरक्षेबाबत चिंता व्यक्त करण्यात आली. कोणत्याही देशात धर्म, जात, भाषा किंवा राजकीय मतभेदांच्या आधारे नागरिकांना लक्ष्य केले जात असेल, तर ती त्या देशाच्या घटनात्मक मूल्यांसाठी चिंतेची बाब ठरते. प्रत्येक नागरिकाला समान सुरक्षा देण्याची कसोटी आहे. मात्र, या परिस्थितीचे संपूर्ण खापर एका व्यक्तीवर फोडून प्रश्न संपत नाही.

हिंसाचार घडविणारे घटक कोण होते, प्रशासनाने कोणती पावले उचलली, पोलिस आणि न्यायव्यवस्थेची भूमिका काय होती, तसेच दोषींवर कारवाई झाली का, या प्रश्नांची उत्तरे महत्त्वाची आहेत. युनूस यांच्या नेतृत्वाखालील हंगामी प्रशासनाच्या कामगिरीचे मूल्यमापन करताना त्यांच्या कार्यकाळातील निर्णय, उपलब्ध पुरावे आणि प्रत्यक्ष परिणाम यांची चिकित्सा करणे आवश्यक आहे. न्यूयॉर्कमधील घटनेचा एक महत्त्वाचा पैलू म्हणजे अनिवासी नागरिकांचे आपल्या मातृभूमीशी असलेले नाते. रोजगार, शिक्षण किंवा अन्य कारणांमुळे परदेशातील नागरिकांचे भौगोलिक वास्तव्य बदलले, तरी मायदेशाशी जोडलेल्या भावना संपत नाहीत. मायदेशातील हिंसाचार, राजकीय अस्थैर्य, आर्थिक अनिश्चितता किंवा नागरिकांच्या हक्कांचे उल्लंघन यांचा परिणाम यामुळे निवासी नागरिकांना नातेवाइकांची सुरक्षितता, देशाची आंतरराष्ट्रीय प्रतिमा यांविषयी त्यांना चिंता वाटू शकते.

लोकशाहीत सरकारला प्रश्न विचारणे हा नागरिकांचा अधिकार आहे. न्यूयॉर्क विमानतळावरील घटनेत काही नागरिकांनी युनूस यांच्याविरोधात आक्रमक भाषा वापरल्याचे वृत्त आहे. काही नागरिकांचा संताप हा व्यापक जनमताचा निर्विवाद पुरावा ठरत नाही; परंतु तो दुर्लक्षित करण्यासारखा संकेतही नाही. राष्ट्रप्रेम म्हणजे केवळ राष्ट्रध्वजाचा अभिमान बाळगणे, देशाच्या गौरवाची घोषणा करणे किंवा परदेशात आपल्या देशाचे समर्थन करणे नव्हे. देशातील नागरिक कितपत सुरक्षित आहेत , त्यांना न्याय मिळतो का, प्रशासन उत्तरदायी आहे का आणि संविधानाने दिलेले अधिकार प्रत्यक्षात जपले जातात का, याविषयी जागरूक राहणे हेदेखील राष्ट्रप्रेमाचेच स्वरूप आहे. देशातील सत्ताधाऱ्यांना त्यांच्या निर्णयांचा हिशेब विचारणे हा देशद्रोह नव्हे तर लोकशाहीतील उत्तरदायित्वाचा महत्त्वाचा भाग आहे. एखाद्या व्यक्तीवर गंभीर आरोप असतील, तर त्यांची चौकशी व्हावी, पुरावे सार्वजनिकरीत्या तपासले जावेत आणि दोष सिद्ध झाल्यास कायद्यानुसार कारवाई व्हावी. बांगलादेशच्या संदर्भात आंतरराष्ट्रीय समुदायाने संपूर्ण परिस्थितीचे मूल्यमापन केले पाहिजे. संयुक्त राष्ट्रांच्या मानवाधिकार कार्यालयाने २०२४ मधील आंदोलन आणि त्यानंतरच्या घडामोडींमध्ये झालेल्या गंभीर मानवी हक्कांच्या उल्लंघनांबाबत निष्पक्ष तपासाची गरज अधोरेखित केली होती. त्यात सुरक्षा दलांकडून झालेल्या कथित अतिरेकी बळाच्या वापराबरोबरच सत्तांतरानंतरचे हल्ले, सूडभावनेतून झालेली हिंसा आणि अल्पसंख्याकांवरील अत्याचार यांचाही विचार आवश्यक असल्याचे नमूद केले होते.

बांगलादेशातील संकटाचे मूल्यमापन करताना पूर्वीच्या सत्तेची जबाबदारी आणि त्यानंतरच्या हंगामी प्रशासनाची जबाबदारी यांची स्वतंत्रपणे तपासणी झाली पाहिजे. सत्ताधारी कोणताही असो, कायदा सर्वांना समान लागू होणे आणि प्रत्येक आरोपाची निष्पक्ष चौकशी होणे, ही लोकशाहीची बुज आहे, ती राखली पाहिजे. भारतासाठीही या घडामोडी महत्त्वाच्या आहेत. भारत आणि बांगलादेश यांच्यात ऐतिहासिक, सांस्कृतिक, आर्थिक आणि भौगोलिक संबंध आहेत. दोन्ही देशांतील शांतता आणि स्थैर्याचा परिणाम सीमावर्ती सुरक्षा, व्यापार, संपर्कव्यवस्था आणि प्रादेशिक सहकार्यावर होतो. बांगलादेशातील हिंदू व अन्य अल्पसंख्याकांच्या सुरक्षिततेचा प्रश्न भारतातील नागरिकांसाठी संवेदनशील असणे स्वाभाविक आहे. मात्र, या प्रश्नावर भूमिका घेताना वस्तुनिष्ठ माहिती, राजनैतिक संवाद आणि मानवी हक्कांचा आग्रह यांना प्राधान्य दिले पाहिजे. मोहम्मद युनूस यांना न्यूयॉर्क विमानतळावर झालेल्या विरोधातून एक व्यापक संदेश पुढे येतो, तो म्हणजे सत्तेची प्रतिष्ठा ही पद, पुरस्कार किंवा आंतरराष्ट्रीय प्रसिद्धीवर कायमस्वरूपी अवलंबून नसते.

सार्वजनिक विश्वास टिकविण्यासाठी पारदर्शकता, न्याय आणि उत्तरदायित्व आवश्यक असते. त्यांना मिळालेला नोबेल पारितोषिक हा मोठा सन्मान असला, तरी तो कोणत्याही व्यक्तीला सार्वजनिक प्रश्नांपासून सूट देत नाही. राष्ट्रप्रेमाची खरी कसोटी सत्ताधाऱ्यांच्या जयघोषात नसून अन्यायाविरोधात निर्भयपणे प्रश्न विचारण्यात, सत्याचा आग्रह धरण्यात आणि न्याय्य व्यवस्थेसाठी उभे राहण्यात आहे. बांगलादेशातील नागरिकांच्या रोषाला उत्तर द्यायचे असेल तर त्यासाठी सत्यशोधन, निष्पक्ष चौकशी, दोषींवरील कायदेशीर कारवाई आणि लोकशाही संस्थांचे बळकटीकरण आवश्यक आहे. कोणत्याही देशाचे भविष्य व्यक्तिपूजेवर किंवा व्यक्तिद्वेषावर नव्हे, तर कायद्याचे राज्य, मानवी प्रतिष्ठा आणि नागरिकांच्या विश्वासावर उभे राहते. न्यूयॉर्कमधील ही घटना याच मूलभूत सत्याची पुन्हा आठवण करून देते.

# ऊसदराचा संघर्ष पेटला



**ऊस उत्पादक शेतकऱ्यांना त्यांच्या घामाचा योग्य मोबदला मिळावा, या मागणीने आता ऊसदराचा संघर्ष तीव्र झाला आहे. ऊस परिषदेत जाहीर झालेला दर मिळाल्याशिवाय ऊसतोड आणि वाहतूक सुरू होऊ देणार नाही, अशी आक्रमक भूमिका स्वाभिमानी शेतकरी संघटनेने घेतली आहे. दुसरीकडे, उसाला प्रतिटन पाच हजार रुपये दर जाहीर करण्याच्या मागणीसाठी शेतकरी सेनेनेही आंदोलनाचे हत्यार उपसले आहे. सातारा जिल्ह्यातील खटाव तालुक्यात नऊ गावांमध्ये ऊस वाहतूक रोखण्याची मोहीम राबविण्यात आली, तर सांगली जिल्हातील खानापूर तालुक्यातील जोंधळखिंडी फाट्यावर उसाने भरलेली २० हून अधिक वाहने अडवून शेतकरी सेनेने कारखानदारांचे लक्ष वेधले. त्यामुळे ऊसदराचा प्रश्न ऐरणीवर आला असून, आगामी काळात आंदोलन अधिक तीव्र होण्याची शक्यता आहे.**



**अशोक सुतार**

**कृष्णाकाठ...**

साखर उद्योगातील आर्थिक घडामोडी, साखरेचे बाजारभाव आणि शेतकऱ्यांचा उत्पादन खर्च या पार्श्वभूमीवर ऊसदर निश्चित करण्याची मागणी जोर धरत आहे. ऊस उत्पादनासाठी लागणारी खते, औषधे, पाणी, वीज, मशागत, मजुरी आणि तोडणी-वाहतुकीचा खर्च सातत्याने वाढत असल्याने अपेक्षित उत्पन्न मिळत नसल्याची शेतकऱ्यांची तक्रार आहे. त्यामुळे उसाला प्रतिटन पाच हजार रुपये दर मिळावा, अशी मागणी शेतकरी संघटनांकडून केली जात आहे. साखरेच्या बाजारातील दरवाढीचा लाभ ऊस उत्पादकांनाही मिळायला हवा, अशी त्यांची भूमिका आहे. मात्र, साखरेचे बाजारभाव वाढले म्हणजे त्याचा संपूर्ण लाभ शेतकर्यांना मिळतोच असे नाही. साखर उत्पादनाचा खर्च, उपपदार्थांपासून मिळणारे उत्पन्न आणि कारखान्यांची आर्थिक स्थिती यांचाही विचार करून दरनिश्चिती पारदर्शक पद्धतीने होणे आवश्यक आहे. यात एक गोष्ट निश्चित आहे, बाजारपेठेत साखरेचे दर वाढले, ऊसाचे दर कधी वाढणार, हा प्रश्न चर्चेत आहे.

स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे प्रदेश कार्याध्यक्ष अनिल पवार आणि तालुकाध्यक्ष दत्तूकाका घार्गे यांच्या नेतृत्वाखाली पदाधिकाऱ्यांनी थेट ऊसाच्या फडात उतरून आंदोलन सुरू केले आहे. सातारा जिल्ह्यातील गोपूज, वाकळवाडी, नायकाचीवाडी, निमसोड, अंबवडे, हिंगणे, डाळमोडी, चितळी आणि मायणी या गावांमध्ये शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन ऊसदराच्या प्रश्नावर जनजागृती करण्यात आली. ऊस परिषदेत जाहीर झालेला दर मिळणे हा शेतकऱ्यांचा हक्क असल्याचे सांगत, दराचा प्रश्न निकाली निघेपर्यंत ऊस कारखान्याला पाठवू नये, असे आवाहन करण्यात आले. ऊस वाहतूकदारांना समज देऊन वाहतूक थांबविण्याची विनंती करण्यात आली आहे. मागण्यांकडे दुर्लक्ष करून वाहतूक सुरू ठेवल्यास आंदोलन अधिक तीव्र केले जाईल, असा इशारा दत्तूकाका घार्गे यांनी दिला. ऊसदराचा प्रश्न सुटेपर्यंत वाहतूक सुरू ठेवण्याचा प्रयत्न झाल्यास कारखान्यांच्या गव्हाण बंद पाडण्यापर्यंत आंदोलन नेले जाईल, असेही संघटनेने स्पष्ट केले. सोनहिरा, अजिंक्यतारा, शिवनेरी, वर्धन (पडळ), खटाव आणि जरंडेश्वर या कारखान्यांच्या प्रशासनाने दराबाबत तातडीने भूमिका स्पष्ट करावी, अशी मागणी करण्यात आली आहे.

शेतकरी सेनेने रविवारी (दि. ११ ऑक्टोबर) जोंधळखिंडी फाट्यावर उसाला प्रतिटन पाच हजार रुपये दर मिळावा, या मागणीसाठी आंदोलन केले. उसाने भरलेले २० हून अधिक ट्रॅक्टर आणि ट्रक अडवून कार्यकर्त्यांनी कारखानदारांविरोधात घोषणाबाजी केली. शुक्रवारी (दि. ९ ऑक्टोबर) विटा तहसीलदार कार्यालयात तहसीलदारांच्या उपस्थितीत ऊसदर निश्चित होईपर्यंत साखर कारखाने सुरू करू नयेत, असा निर्णय झाल्याचा दावा शेतकरी सेनेने केला आहे. मात्र, उदगीर, यशवंत आणि सोनहिरा कारखाने सुरू झाल्याने शेतकऱ्यांवर अन्याय होत असल्याचा आरोप संघटनेने केला. शेतकरी सेनेचे नेते भक्तराज ठिंगळे यांनी कारखानदारांनी तातडीने दर जाहीर करून त्यानंतरच गाळप सुरू करावे, अशी मागणी केली. दर जाहीर होईपर्यंत ऊस वाहतूक रोखण्याचा इशाराही त्यांनी दिला.

### दरनिश्चितीच्या पारदर्शकतेची गरज

ऊसदराचा प्रश्न केवळ शेतकरी आणि कारखानदार यांच्यातील आर्थिक वादापुरता मर्यादित नाही. ग्रामीण अर्थव्यवस्था, शेतकऱ्यांचे कर्ज, शेतीतील पुढील गुंतवणूक आणि साखर उद्योगाची स्थिरता यांच्याशी तो जोडलेला आहे. त्यामुळे शेतकऱ्यांच्या उत्पादन खर्चाचा वास्तववादी आढावा घेऊन दर निश्चित करणे, कारखान्यांनी आर्थिक गणित स्पष्ट करणे आणि शासनाने आवश्यक तेथे मध्यस्थी करणे गरजेचे आहे. आंदोलनामुळे ऊसतोड आणि वाहतूक विस्कळीत झाल्यास शेतकऱ्यांसह वाहतूकदार, कामगार आणि कारखान्यांनाही आर्थिक फटका बसू शकतो. म्हणून संघर्ष चिघळण्यापूर्वी संबंधितांनी चर्चेच्या माध्यमातून तोडगा काढावा. शेतकऱ्यांना रास्त दर मिळणे आणि साखर उद्योगाचे कामकाज सुरळीत राहणे, या दोन्ही बाबींचा समतोल साधणे हीच काळाची गरज आहे.

# शेरेत निनाई-शेराईदेवी नवरात्रोत्सवाचा भक्तिमय जागर

**कराड/प्रतिनिधी : –**

शेरे (ता. कराड) येथील ग्रामदैवत निनाई-शेराईदेवीच्या शारदीय नवरात्रोत्सवाला सोमवारी भक्तिमय वातावरणात प्रारंभ झाला. मंदिरातील आकर्षक विद्युत रोषणाई, फुलांची सजावट आणि विविध धार्मिक-सांस्कृतिक कार्यक्रमांमुळे गावात उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे. नवरात्रोत्सवानिमित्त पुढील काही दिवसांत पारंपरिक कला, भजन, भारूड, व्याख्यान आणि महिलांसाठी विशेष कार्यक्रमांची रेलचेल असणार आहे.

उत्सवाच्या दुसऱ्या दिवशी, मंगळवारी नांदगाव येथील पाचंगे बंधू यांचा 'आदिमायेचा गोंधळ' हा पारंपरिक कार्यक्रम होणार आहे. बुधवारी कराड येथील सखी मंगळा गौर महिला मंडळाच्या वतीने पारंपरिक खेळांचे सादरीकरण केले जाणार आहे. गुरुवारी ज्येष्ठ माता सन्मान सोहळ्याचे आयोजन करण्यात आले असून, यावेळी वैष्णवी वीर यांचे 'छत्रपती संभाजी महाराज' या विषयावर व्याख्यान होईल. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी आनंदराव जानुगडे असणार आहेत.

शुक्रवारी विकास लाहिगडे व मधुर लाहिगडे यांच्या भजनाचा कार्यक्रम रंगणार आहे. शनिवारी महिलांसाठी 'होम मिनिस्टर' या विशेष खेळाचे आयोजन करण्यात आले असून, जिल्हा परिषद सदस्या प्रियांका साळुंखे आणि पंचायत समिती सदस्या वर्षा निकम यांची प्रमुख उपस्थिती लाभणार आहे. रविवारी मोहिते आणि अतुल हातेकर यांच्यात 'मनोरंजनातून प्रबोधनाकडे' हा भारुडाचा सामना रंगणार आहे. विविध धार्मिक व सांस्कृतिक कार्यक्रमांनी सजलेल्या या नवरात्रोत्सवाची सांगता मंगळवारी दसऱ्याच्या दिवशी होणार आहे. यानिमित्त श्रींची भव्य मिरवणूक काढण्यात येणार असून, उत्सवाची सांगता पारंपरिक उत्साहात होईल.

# आ.पडळकारांना धक्का;जिल्हा...

**पान १ वरुन** न्यायाधीशांच्या अध्यक्षतेखाली समिती नियुक्त करण्यास भाग पाडले होते. या समितीने आजी-माजी संचालकांना क्लीन चिट दिली असली, तरी पडळकरांनी जत विधानसभा मतदारसंघातून सोसायटी गटातून निवडणुकीत उतरण्यासाठी व्यूहरचना आखली होती.

पडळकरांनी अर्जासोबत जोडलेल्या कुणीकोणूर सर्वसेवा सहकारी सोसायटीच्या सभासदत्वावर आणि निंबवडे ग्रामीण बिगरशेती पतसंस्थेतील संचालकपदाच्या अनुभवावर आक्षेप घेत माजी आमदार विक्रम सावंत व बाजार समितीचे माजी सभापती सुजय शिंदे यांनी कोल्हापूर सर्किट बेंचमध्ये याचिका दाखल केली होती. बँकेच्या उपविधीनुसार संबंधित संस्थेचे दोन वर्षांचे सभासदत्व आणि किमान एक वर्ष व्यवस्थापक समितीवर कामाचा अनुभव असणे आवश्यक असल्याचा दावा त्यांनी केला होता. याचिकेमध्ये, २० फेब्रुवारी रोजी कुणीकोणूर येथे जमीन खरेदी केल्याने त्यापूर्वीचे सभासदत्व कोणत्या आधारावर मिळाले, असा सवाल उपस्थित करण्यात आला होता. तसेच निंबवडे पतसंस्थेचे कार्यक्षेत्र गावापुरते मर्यादित असताना तेथील सभासदत्व व संचालकपद पात्र ठरते का, याबाबतही प्रश्न उपस्थित करण्यात आला होता. निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांनी सुरुवातीला ही हरकत फेटाळून अर्ज वैध ठरवला होता, मात्र या निर्णयाला न्यायालयात आव्हान देण्यात आले होते.

न्यायालयाने याचिकाकर्त्यांची हरकत ग्राह्य धरत आमदार पडळकरांनी दाखल केलेले कागदपत्र आणि पुरावे चुकीचे असल्याचे स्पष्ट करत त्यांचा अर्ज अवैध ठरवला. या न्यायालयीन निर्णयामुळे जत 'अ' सोसायटी गटातील निवडणुकीचे चित्र बदलले असून, महाविकास आघाडीच्या नेते व कार्यकर्त्यांमध्ये मोठा उत्साह दिसून येत आहे.

# सोलापूर जिल्ह्यातील मुलुख मैदानी तोफ प्रा.तुकाराम दुपारगुडे सर यांचा असंख्य कार्यकर्त्यांसह भाजपमध्ये प्रवेश

## आमदार सचिनदादा कल्याणशेट्टी यांनी केले स्वागत

**अक्कलकोट/प्रतिनिधी:–**

सोलापूर जिल्ह्यातील ज्येष्ठ काँग्रेस चे पदाधिकारी असलेले आणि सोलापूर जिल्ह्यातील मुलुख मैदानी तोफ म्हणून ओळखले जाणारे व शब्दांचा बादशाह असलेले प्राध्यापक तुकाराम दुपारगुडे सर यांचा असंख्य कार्यकर्त्यांसह भाजप मध्ये प्रवेश झाला. या प्रवेशावेळी स्वतः आमदार सचिनदादा कल्याणशेट्टी हेदेखील उपस्थित होते यावेळी आमदार सचिनदादा कल्याणशेट्टी यांनी प्राध्यापक तुकाराम दुपारगुडे सर यांचे स्वागत केले.




सोलापूर जिल्ह्यातील वक्तृत्वाचा बुलंद आवाज! प्रभावी वक्तृत्व, शब्दांवर विलक्षण प्रभुत्व! असलेले आंबेडकरी चळवळीतीचे मार्गदर्शक असलेले प्राध्यापक तुकाराम दुपारगुडे सर यांनी

आज आमदार सचिनदादा कल्याणशेट्टी साहेबांच्या प्रमुख उपस्थितीत त्यांच्या हजारो कार्यकर्त्यांसह भारतीय जनता पार्टीमध्ये प्रवेश केला आहे. प्रा. तुकाराम दुपारगुडे सर यांचे आमदार सचिनदादा कल्याणशेट्टी यांनी त्यांचा सत्कार करून पक्षात स्वागत केले. प्रा.तुकाराम दुपारगुडे सर हे वक्तृत्वाच्या मैदानातील मुलुख मैदानी तोफ म्हणून ओळखले जातात. या तोफेला पुढील राजकीय वाटचालीस विलक्षण ताकत मिळो आणी अशीच ही तोफ सदैव धडाडत राहो अशी या सदिच्छाआंबेडकरी चळवळीतील कार्यकर्त्यांनी व्यक्त केली आहे.

# देवीच्या पूजेत कुंकुमार्चनाचे आध्यात्मिक आणि शास्त्रीय महत्त्व!



आपल्या सनातन धर्मपरंपरेत देवीच्या पूजेमध्ये कुंकुमार्चनाला अत्यंत अग्रगण्य आणि पवित्र स्थान दिले गेले आहे. देवीला कुंकुमार्चन करण्याच्या प्रामुख्याने दोन पद्धती प्रचलित आहेत

पद्धत १ : देवीचा नामजप करत एक-एक चिमूटभर कुंकू देवीच्या चरणांपासून प्रारंभ करून तिच्या डोक्यापर्यंत वाहावे अथवा नामजप करत तिला कुंकवाने स्नान घालावे.

पद्धत २ : काही ठिकाणी कुंकुमार्चन करताना कुंकू केवळ देवीच्या चरणांवरच वाहिले जाते. कुंकुमार्चनामागील शास्त्र आणि आध्यात्मिक लाभ: कुंकुमार्चन करण्याच्या या उपचारामागे सखोल शास्त्र दडलेले आहे. ब्रह्मांडातील मूळ कार्यरत शक्तीतत्त्वाची निर्मिती ही लाल रंगाच्या प्रकाशातून झाली आहे. शक्तीतत्त्वाचे दर्शक म्हणूनच देवीची पूजा प्रामुख्याने कुंकवाने केली जाते.

**वाचकाचे पत्र**

कुंकवातून प्रक्षेपित होणाऱ्या गंधलहरींच्या सुवासाकडे ब्रह्मांडातील शक्तीतत्त्वाची आकर्षण क्षमता शक्तीतत्त्वाच्या लहरी अत्यंत अल्प कालावधीत आकृष्ट होतात. साधर्म्य असणारा गंध मूळ शक्तीतत्त्वाच्या बिजाचा गंध हासुद्धा कुंकवातून दरवळणाऱ्या सुवासाशी साधर्म्य दर्शवणारा असतो. त्यामुळे मूर्तीतील सगुण तत्त्वाला जागृत करण्यासाठी व देवीतत्त्वाला प्रसन्न करण्यासाठी कुंकवाचा उपचार हे एक प्रभावी माध्यम ठरत. त्याचप्रमाणे कुंकवात शक्तीतत्त्व आकृष्ट करण्याची क्षमता सर्वाधिक असते म्हणून देवीच्या मूर्तीला कुंकुमार्चन केल्यावर ती मूर्ती जागृत होते. कुंकुमार्चनामुळे जागृत झालेल्या मूर्तीतील दिव्य शक्तीतत्त्व कुंकवामध्ये संक्रमित होते व नंतर ते कुंकू जेव्हा आपण आपल्या कपाळावर लावतो, तेव्हा त्यातील देवीची सूक्ष्म शक्ती आपल्याला प्रत्यक्ष प्राप्त होते.

अशा प्रकारे कुंकुमार्चन हा केवळ एक बाह्य पूजविधी नसून, भक्ताला देवीच्या प्रत्यक्ष शक्तीतत्त्वाचा लाभ मिळवून देणारा अत्यंत प्रभावी व वैज्ञानिक अध्यात्मिक उपचार आहे.

**श्रीमती वासंती लावंघरे, सातारा**

# सोलापूरातील जी.एम.चौक ते एस.टी. स्टॅन्डकडे जाणारा रस्ता तात्काळ दुरुस्त करा

## अन्यथा तीव्र आंदोलन छेडणार; भीमसैनिक सामाजिक संघटनेचा परिवहन मंत्र्यांना इशारा

**सोलापूर/प्रतिनिधी:–**

सोलापूर शहरातील मध्यवर्ती असलेल्या जी.एम. चौक ते एस.टी. डेपो व एस.टी. स्टॅन्ड मध्ये जाणारा अंतर्गत रस्ता गेल्या ३ ते ४ वर्षांपासून अत्यंत दयनीय अवस्थेत असून, या रस्त्यावर १०० पेक्षा जास्त भलेमोठे खड्डे पडले आहेत. या रस्त्याकडे संबंधित विभागाने पूर्णपणे दुर्लक्ष केले असल्याचा आरोप भिमसैनिक सामाजिक संघटना (महाराष्ट्र प्रदेश)* यांच्या वतीने करण्यात आला आहे.



या संदर्भात संघटनेचे संस्थापक अध्यक्ष संतराम (शांतीकुमार) नागटिळक, शहर अध्यक्ष डॉ. किरण खरात आणि जिल्हा अध्यक्ष सचिन गायकवाड यांनी परिवहन मंत्री ना. प्रताप सरनाईक आणि विभाग नियंत्रक, राज्य परिवहन महामंडळ, सोलापूर विभाग यांना तक्रार निवेदन दिले आहे. हे निवेदन मंत्रालय मध्यवर्ती टपाल केंद्रात दि. ८-१०-२६ रोजी दाखल झाले आहे.

निवेदनात म्हटले आहे की, सोलापूर हा मध्यवर्ती विभाग असून तुळजापूर, अक्कलकोट, पंढरपूर, गाणगापूर तसेच परराज्यातून दररोज लाखो प्रवासी येथे येत-जात असतात. खड्डेमय रस्त्यामुळे बाहेरून येणाऱ्या प्रवाशांना, विशेषतः वयोवृद्ध महिला व पुरुषांना मोठा मानसिक त्रास सहन करावा लागत आहे. किरकोळ अपघाताचे प्रकार नित्याचेच झाले आहेत.

पावसाळ्यात या ठिकाणी घाणीचे साम्राज्य पसरते, आजुबाजूला मोठ्या प्रमाणात कचरा साचला आहे. बाहेर गावाहून येणाऱ्या एस.टी. बसेस या खड्ड्यातून जाताना स्लिप होण्याची व समोरून येणाऱ्या वाहनाला धडक बसण्याची शक्यता असते. दुचाकी वाहने खड्ड्यात पडून अनेकजण जखमी झाले आहेत.

एक महिन्याच्या आत रस्त्याचे डांबरीकरण किंवा सिमेंट काँक्रीटीकरण करावे, अन्यथा संघटनेच्या वतीने रस्ता रोको, निदर्शने व उपोषण असे तीव्र आंदोलन छेडण्यात येईल आणि या आंदोलनात काही अनुचित प्रकार घडल्यास त्यास विभाग नियंत्रक कार्यालय व संबंधित अधिकारी जबाबदार राहतील, असा इशारा निवेदनात देण्यात आला आहे.

या निवेदनाच्या प्रती मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री, पोलीस आयुक्त सोलापूर, जिल्हाधिकारी सोलापूर आणि पालकमंत्री सोलापूर यांना पाठविण्यात आल्या आहेत..

## अपघातास कारणीभूत ठरल्याप्रकरणी कार चालकावर गुन्हा

**सातारा/प्रतिनिधी:–**

अपघातात एकास जखमी केल्याप्रकरणी कार चालका विरोधात सातारा शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत पोलिसांनी दिलेली माहिती अशी, दि. ९ रोजी रात्री साडेदहा वाजण्याच्या सुमारास सातारा-कोरेगाव रस्त्यावर एका रिक्षाला भरधाव वेगाने येणाऱ्या इको कार क्र. एमएच ११ डीएन ५५८७ वरील चालकाने धडक दिल्याने रिक्षा मधील सुरज राजेंद्र सूर्यवंशी रा. संगम माहुली, पोस्ट क्षेत्रमाहुली, ता. सातारा हा युवक जखमी झाला आहे. याप्रकरणी कारचालक तेजस मुकुंद पाठक (पत्ता माहीत नाही) याच्या विरोधात सातारा शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## विवाहितेचा विनयभंग प्रकरणी दोन जणांवर गुन्हा

**सातारा/प्रतिनिधी:–**

विवाहितेचा विनयभंग केल्याप्रकरणी दोन जणांविरोधात सातारा तालुका पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत पोलिसांनी दिलेली माहिती अशी दिनांक आठ रोजी संध्याकाळी साडेसात वाजण्याच्या सुमारास एका विवाहितेला धक्काबुक्की करून शिवीगाळ दमदाटी करत तिच्याशी असभ्यवर्तन केल्याप्रकरणी ओंकार दिलीप धनवडे आणि अक्षय दिलीप धनवडे (दोघेही रा. यवतेश्वर, ता. सातारा) यांच्या विरोधात सातारा तालुका पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास पोलीस हवालदार निकम करीत आहेत.





# भन्ते शिलरत्न लेझीम ताफ्याचा सराव सुरू

## माजी पालकमंत्री विजयकुमार देशमुख मालक यांच्या हस्ते ताफ्याचे उद्घाटन

**सोलापूर/ महेश गायकवाड:–**

सोलापूर । धम्मचक्र प्रवर्तन दिनाच्या तयारीला वेग! आला असून येथील न्यु बुधवार पेठ येथील बॉबी ग्रुप च्या लेझिम ताफ्याच्या सरावाचे उद्घाटन सोमवार दिनांक ऑक्टोबर २०२६ रोजी सायंकाळी माजी मंत्री आणि सोलापूर जिल्ह्याचे माजी पालकमंत्री आणि या भागाचे आमदार विजयकुमार देशमुख मालक यांच्या हस्ते शानदार पणाने करण्यात आले.

सोलापुरात ७० व्या धम्मचक्र प्रवर्तन दिनानिमित्त उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे. न्यू बुधवार पेठ येथे भन्ते शिलरत्न लेझीम ताफ्याच्या सरावाचा शुभारंभ आमदार विजयकुमार देशमुख मालक यांच्या प्रमुख उपस्थितीत करण्यात आला.

यावेळी आमदार विजयकुमार देशमुख यांनी स्वतः लेझीमवर ठेका धरत उपस्थितांची मने जिंकली. त्यांच्या सहभागामुळे कार्यकर्त्यांचा उत्साह आणखी वाढला. धम्मचक्र प्रवर्तन दिनाच्या दिवशी या लेझीम पथकाच्या शानदार खेळण्या मध्ये गौतम बुद्ध यांच्या प्रतिमेचे भाऊ मिरवणूक काढण्यात येणार आहे.

या कार्यक्रमाला नगरसेविका प्रभाग क्रमांक ४ च्या लोकप्रिय नगरसेविका वंदनाताई अजित गायकवाड, माजी नगरसेवक अरुण भालेराव, अजित गायकवाड, महेश गजधाने, अश्विन गायकवाड यांच्यासह विविध मान्यवर उपस्थित होते.

धम्मचक्र प्रवर्तन दिनाच्या पार्श्वभूमीवर लेझीम ताफ्याच्या सरावाला सुरुवात झाल्याने परिसरात उत्साहाचे वातावरण पाहायला मिळत आहे.

# 'सहकारभूषण' धन्वंतरी पतसंस्थेतर्फे धन्वंतरी पुरस्कार जाहीर

**सातारा/प्रतिनिधी:–**

सहकार क्षेत्रात संपूर्ण राज्यात आदर्श असणाऱ्या सहकारभूषण धन्वंतरी नागरी सहकारी पतसंस्था कला, क्रीडा, सांस्कृतिक, सामाजिक इ. विविध क्षेत्रात उत्तुंग कार्य करणाऱ्या आपल्या सभासदांना प्रतिवर्षी पुरस्कार वितरित करीत असते. धन्वंतरी पतसंस्थेच्या वतीने तिच्या ३७ व्या वर्धापनदिनाचे औचित्य साधून वैद्यकीय क्षेत्रामध्ये तसेच विविध क्षेत्रात उल्लेखनीय काम करणाऱ्या सभासदांना शुक्रवार, दिनांक १६ ऑक्टोबर रोजी सायंकाळी ४ वाजता धन्वंतरी भवन, शनिवार पेठ, सातारा येथील धन्वंतरी सभागृहात पुरस्कार वितरण सभारंभआयोजित केला आहे.




धन्वंतरी पतसंस्थेच्या संचालक मंडळाने गत चार वर्षाकरिताचे पुरस्कार संस्थेने जाहीर केल्याचे संस्थापक चेअरमन डॉ. रवींद्र भोसले यांनी सांगितले. यामध्ये सन २०२२-२३ करिता डॉ. विलास हिराचंद शहा, डॉ. विजयकुमार शंकरराव सुखटणकर, डॉ. सुभाष बळवंत हिरवे यांना तर २०२३-२४ करिता डॉ. सुधाकर एकनाथ लावंड, डॉ. महादेव शंकर मोरे, डॉ. सुधाकर शंकरराव बेंद्रे यांना, तसेच २०२४-२५ करिता डॉ. दिलीप महादेव पटवर्धन, डॉ. श्रीरंग आबाजी कुंभार, डॉ. सुधीर परशुराम पवार, २०२५-२६ करिता स्व. डॉ. क. श्री. लाहोटी, स्व. अरुण रामकृष्ण गोडबोले, डॉ. सौ. प्रिया महेश शिंदे यांचा समावेश असून या सभासदांनी केलेल्या उत्तुंग कामगिरीबद्दल धन्वंतरी पुरस्कार जाहीर झाले आहेत. रोख रक्कम, मानपत्र, मोमेंटो, शाल, पुष्पगुच्छ असे या पुरस्काराचे स्वरुप आहे. सदर कार्यक्रमास सर्व सभासद, ठेवीदार, कर्जदार, हितचिंतक यांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन संचालक मंडळातर्फे चेअरमन डॉ. रवींद्र भोसले व व्हा. चेअरमन डॉ. कांत फडतरे यांनी केले आहे.

**हे पत्र संपादक, मालक, प्रकाशक श्री.शशिकांत आकाराम पाटील यांनी प्रीतिसंगम प्रिंटर्स, कोयना औद्योगिक वसाहत, मलकापूर–कराड येथे छापून गोदावरी प्लाझा, हेड पोस्टाजवळ, शनिवार पेठ कराड, येथे प्रसिद्ध केले आहे. या पत्रात प्रसिद्ध झालेल्या मजकुराशी संपादक सहमत असतीलच असे नाही. R.N.I.No.MAHMAR./२००१/१०३३८ रजिस्टर No.MAHMAR/14511/13/1/96/Te पोस्ट परवाना No./KRDDN/008/2024-2026 *मुख्य कार्यालय:– गोदावरी प्लाझा, हेड पोस्ट जवळ, शनिवार पेठ कराड, जि.सातारा, पिनकोड – ४१५११० फोन (०२१६४)२२७७२५,,फॅक्स २२६९२५, * सातारा कार्यालय:– संजीवन सीटी स्कॅन शेजारी, सिव्हील हॉस्पिटल रोड, सातारा फोन नं:–९२२६३९८८१७ RNI.mar/२००१/१०३३८.**
email-pritisangamkarad@gmail.com

# साडेपाच हजार रुपये पहिली उचल मिळाल्याशिवाय कारखाने सुरू करू देणार नाही

## येडेमच्छिंद्र येथे स्वाभिमानी शेतकरी संघटनेने कृष्णा कारखान्याची ऊस वाहतूक रोखली; १० ते १२ ट्रॅक्टर अडविले

**ईश्वरपूर /प्रतिनिधी:–**

चालू गळीत हंगामात उसाला प्रतिटन ५ हजार ५०० रुपये पहिली उचल मिळावी, या मागणीसाठी स्वाभिमानी शेतकरी संघटनेने वाळवा तालुक्यात आंदोलनाची धार तीव्र केली आहे. येडेमच्छिंद्र येथील क्रांतिसिंह नाना पाटील चौकात य. मो. कृष्णा सहकारी साखर कारखान्याची ऊस वाहतूक करणारे १० ते १२ ट्रॅक्टर अडवून संघटनेच्या कार्यकर्त्यांनी वाहतूक रोखली. ऊसदराचा प्रश्न मार्गी लागल्याशिवाय कारखान्यांचा गळीत हंगाम सुरळीत चालू देणार नाही, असा इशारा यावेळी देण्यात आला.

कृष्णा सहकारी साखर कारखान्याने चालू गळीत हंगाम सुरू केला आहे. मात्र, ऊसदराचा प्रश्न निकाली निघेपर्यंत कारखाना सुरू करू नये, अशी मागणी स्वाभिमानी शेतकरी संघटनेने निवेदनाद्वारे केली होती. या मागणीकडे कारखाना प्रशासनाने दुर्लक्ष केल्याचा आरोप करत संघटनेच्या कार्यकर्त्यांनी येडेमच्छिंद्र येथे ऊस वाहतूक रोखली. यावेळी कार्यकर्त्यांनी जोरदार घोषणाबाजी करत ऊस उत्पादक शेतकऱ्यांना योग्य दर देण्याची मागणी शेतीच्या मशागतीपासून ते ऊस लागवड, खते, औषधे, मजुरी आणि तोडणी–वाहतुकीपर्यंतच्या खर्चात मोठी वाढ झाली आहे. त्या तुलनेत ऊस उत्पादक शेतकऱ्यांना मिळणारा दर पुरेसा नसल्याचे संघटनेचे म्हणणे आहे. त्यामुळे उसाला प्रतिटन ५ हजार ५०० रुपये पहिली उचल मिळावी, अशी मागणी करण्यात येत आहे. ही मागणी मान्य न झाल्यास आंदोलन अधिक तीव्र करण्याचा इशाराही संघटनेने दिला.

दरम्यान, साखरेच्या बाजारभावाचा फायदा ऊस उत्पादक शेतकऱ्यांनाही मिळायला हवा. मात्र, शेतकऱ्यांना योग्य दर देण्याबाबत कारखानदारांकडून ठोस निर्णय घेतला जात नसल्याचा आरोप संघटनेने केला आहे. त्यामुळे गळीत हंगामाच्या सुरुवातीलाच ऊसदराचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे.



येडे मच्छिंद्र ता. वाळवा येथे ऊस वाहतूक रोखताना स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे मानसिग पाटील आकाश साळुखे सतोष पाटील सह कार्यकर्ते

या आंदोलनात स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे युवा आघाडीचे तालुकाध्यक्ष प्रदीप पाटील, आकाश साळुखे, मानसिंगराव पाटील संतोष पाटील, समीर मुल्ला ऋषिकेश पाटील अमर पाटील अभिजित पाटील सुभाष दबडे यशवंत मोरे वैभव पाटील यांच्यासह संघटनेचे कार्यकर्ते सहभागी झाले होते.

स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे नेते भागवत जाधव म्हणाले, साखर कारखानदार सात ते आठ टक्के रिकव्हरी असलेला ऊस गाळपासाठी नेत असल्याने शेतकऱ्यांचे आर्थिक नुकसान होत आहे. यामुळे प्रतिटन ५०० ते ६०० रुपयांचा फटका शेतकऱ्यांना बसण्याची शक्यता आहे. यंदा देशात साखरेची टंचाई निर्माण होण्याची शक्यता असून, दसरा–दिवाळीच्या काळात साखरेचे दर वाढण्याची शक्यता आहे,त्यामुळे शेतकर्यांनि ऊस तोडी साठी जरा धीर धरा..



कराड : इनरव्हिल क्लब संगम यांच्या वतीने डॉ रूपाली देसाई यांना जिजाऊ पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले. यावेळी उपस्थित मान्यवर.

# डॉ.रुपाली देसाई जिजाऊ पुरस्काराने सन्मानित

**कराड/प्रतिनिधी:–**

नाडे नवारस्ता येथील डॉ. रुपाली देसाई यांना कराड येथील इनरव्हील क्लब झीरल यांच्यावतीने ' जिजाऊ पुरस्कार २०२६ हा देऊन सन्मानित करण्यात आले. या पुरस्कराबद्दल त्यांचे सर्व स्तरातून अभिनदन् होत आहे

कराड येथील वेणूताई चव्हाण सभाग्रहात वार्षिक स्नेह संमेलन विविध मान्य वरांच्या उपस्थितीत पार पडला.त्यावेळी डॉ. देसाई यांना हा पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले.

कराड येथील इनरव्हिल क्लब संगम यांच्या वतीने समाजातील उल्लेखनीय काम करणाऱ्या महिलाना मागील अनेक वर्षापासून विविध पुरस्काराने सन्मानित करण्यात येते. डॉ रूपाली देसाई यांनी मागील २० वर्षे वैद्यकीय सेवेसह शिक्षणिक विभागात काम करतांना समाजाच्या गरजु लोकांना मदत करणे, भूकप ग्रस्त, आरोग्य शिबीराचे आयोजन करणे, महिला सक्षमीकरण, समुपदेशन , अशा विविध विभागात त्यांनी उलेखनीय काम केले आहे. आजही त्या समाजाच्या प्रत्येक घटकासाठी अहोरात्र मेहनत घेत आहेत. त्यांच्या या कार्याची दखल घेत त्यांना मानाचा जिजाऊ पुरस्कार' घेऊन गौरवण्यात आले आहे. त्यावेळी इनर व्हिल कलबचे सर्व पदाधिकारी उपास्थित होते.

# म.श्वर पालिकेच्या इमारतीत पत्रकार कक्षाची मागणी

## पत्रकार संघाचे नगराध्यक्षांना निवेदन; जागा देण्याची ग्वाही

**महाबळेश्वर/प्रतिनिधी : –**

महाबळेश्वर गिरीस्थान पत्रकार संघ तालुका महाबळेश्वर यांच्या वतीने नगर परिषदेच्या नवीन प्रशासकीय इमारतीमध्ये पत्रकारांसाठी स्वतंत्र पत्रकार कक्ष स्थापन करण्यात यावा, या मागणीचे निवेदन लोकनियुक्त नगराध्यक्ष सुनील शिंदे यांना देण्यात आले. या मागणीला सकारात्मक प्रतिसाद देत पत्रकार कक्ष उपलब्ध करून देण्याची ग्वाही नगराध्यक्ष शिंदे यांनी यावेळी दिली.



महाबळेश्वर नगरपरिषदेच्या नवीन प्रशासकीय इमारतीमध्ये पत्रकारांसाठी स्वतंत्र दालन असावे, अशी मागणीआज पत्रकार संघाच्या वतीने करण्यात आली. पत्रकारांना शहरातील विविध प्रश्नांवर काम करताना बातम्यांचे संकलन करताना तसेच नागरिक, लोकप्रतिनिधी आणि नगर परिषद प्रशासन यांच्याशी संवाद साधताना हक्काची जागा उपलब्ध व्हावी हा या मागणीमागील प्रमुख उद्देश आहे.

पत्रकार हा लोकशाहीचा महत्त्वाचा घटक असून शहरातील नागरिकांच्या समस्या, विकासकामे, नागरी सुविधा आणि प्रशासकीय कामकाज जनतेसमोर मांडण्याची महत्त्वपूर्ण जबाबदारी पत्रकार पार पाडत असतात. अशा परिस्थितीत नगर परिषदेच्या नवीन प्रशासकीय इमारतीमध्ये पत्रकारांसाठी स्वतंत्र कक्ष उपलब्ध झाल्यास पत्रकारांना कामकाजासाठी सोयीचे ठिकाण मिळेल. तसेच नगराध्यक्ष, नगर परिषद अधिकारी–कर्मचारी आणि नागरिक यांच्यात समन्वय साधण्यास मदत होईल, अशी भूमिका पत्रकार संघाच्या वतीने मांडण्यात आली.

पत्रकार संघाच्या पदाधिकाऱ्यांनी नगराध्यक्ष सुनील शिंदे यांच्याकडे निवेदन सादर करून पत्रकार कक्षाची आवश्यकता स्पष्ट केली. यावेळी नगराध्यक्षांनी या मागणीबाबत सकारात्मक भूमिका घेत, तुमची मागणी आम्ही नक्की पूर्ण करू, अशी ग्वाही दिली. त्यामुळे पत्रकार संघाच्या मागणीला यश मिळण्याची आशा निर्माण झाली आहे.

या प्रसंगी महाबळेश्वर गिरीस्थान पत्रकार संघाचे अध्यक्ष संजय चोरगे, सचिव संदीप देवकुळे, शरद झावरे, संतोष पवार, शेखर कदम, शान परवेज डांगे, राजेश सोंडकर, जितेंद्र कारंडे आदी पत्रकार उपस्थित होते.

नगर परिषदेच्या नवीन प्रशासकीय इमारतीमध्ये पत्रकार कक्ष उपलब्ध झाल्यास पत्रकारांना कामकाजासाठी हक्काचे व्यासपीठ मिळण्याबरोबरच प्रशासन आणि नागरिक यांच्यातील संवाद अधिक प्रभावी होण्यास मदत होणार आहे.

# देवकर दाम्पत्याच्या स्मरणार्थ होणार रुग्णवाहिकेचे लोकार्पण

## सतर्क नागरिक स्वयंसेवी संस्थेला रुग्णवाहिका भेट; १५ ऑक्टोबरला सांगलीत सोहळा

**विटा/प्रतिनिधी:–**

सामाजिक बांधिलकी जपत स्वर्गीय सौ. सुवर्ण आणि श्री. आनंदाराव शेटजी यशवंत देवकर (बेजगाव) यांच्या स्मरणार्थ सतर्क नागरिक स्वयंसेवी सामाजिक संस्था, महाराष्ट्र राज्य पोलीस मित्र, आळसंद यांच्यासाठी रुग्णवाहिका उपलब्ध करून देण्यात आली आहे. या रुग्णवाहिकेचा लोकार्पण सोहळा गुरुवार, दि. १५ ऑक्टोबर रोजी सकाळी ९ वाजता सांगली–मिरज रोडवरील भारती हॉस्पिटलसमोरील सेवार्थ क्रिटी केअर सर्व्हिस प्रा. लि. येथे आयोजित करण्यात आला आहे.

गरजू रुग्णांना वेळेत वैद्यकीय मदत मिळावी आणि सामाजिक सेवेच्या कार्याला बळ मिळावे, या उद्देशाने हा उपक्रम राबविण्यात आला आहे. दिवंगत देवकर दाम्पत्याच्या स्मृती जपत समाजोपयोगी कार्यासाठी रुग्णवाहिका उपलब्ध करून देण्याचा हा उपक्रम परिसरातील नागरिकांसाठी उपयुक्त ठरणार आहे.

या सोहळ्यास सांगलीचे पोलीस अधीक्षक तुषार दोषी, पोलीस उपअधीक्षक कल्पना बारवकर, जिल्हा चिकित्सालयाचे विक्रमसिंह कदम, विट्याचे उपविभागीय पोलीस अधिकारी सदाशिव शेलार, तासगावचे उपविभागीय पोलीस अधिकारी किरण अवचर, जतचे उपविभागीय पोलीस अधिकारी सचिन थोरबोले आणि विट्याचे तहसीलदार योगेश्वर टोंपे यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे.

युवा उद्योजक साहिल आनंदाराव देवकर आणि शुभम आनंदाराव देवकर हे कार्यक्रमाचे आयोजक आहेत. सतर्क नागरिक स्वयंसेवी सामाजिक संस्थेचे संस्थापक अध्यक्ष अजित (भैय्या) जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली हा उपक्रम आयोजित करण्यात आला आहे. या लोकार्पण सोहळ्यास नागरिकांनी उपस्थित राहावे, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.



# खातगुणात स्वाभिमानीच्या ऊसतोड बंद आंदोलनाला १०० टक्के पाठिंबा

**पुसेगाव/प्रतिनिधी : –**

तालुक्यात स्वाभिमानी शेतकरी संघटनेच्या वतीने सुरू असलेल्या ऊसतोड बंद आंदोलनाला गावोगावी शेतकऱ्यांचा मोठा पाठिंबा मिळत आहे. या आंदोलनाला पाठिंबा देत खातगुण गावातील शेतकऱ्यांनी १०० टक्के ऊसतोड बंद ठेवून आंदोलनात सक्रिय सहभाग नोंदविला.

ऊसाला योग्य व परवडणारा दर जाहीर करावा, या प्रमुख मागणीसाठी स्वाभिमानी शेतकरी संघटनेने ऊसतोड बंद आंदोलन सुरू केले आहे. खातगुण येथील शेतकऱ्यांनी एकजुटीने ऊसतोड बंद ठेवत संघटनेच्या मागण्यांना पाठिंबा दर्शविला. यावेळी शेतकऱ्यांनी ऊसाला योग्य दर मिळेपर्यंत ऊसतोड बंद आंदोलनाला पाठिंबा कायम ठेवण्याचा निर्धार व्यक्त केला.

यावेळी सोसायटीचे माजी चेअरमन विजय लावंड, हरिश्चंद्र लावंड, सुदाम लावंड, गजानन लावंड, संजय लावंड, संजय गुजर, भरत भुजबळ, धनंजय मुंडे, संदीप चव्हाण, प्रकाश लावंड, दत्ता लावंड, तात्याराव लावंड, अनिल जाधव, अनिल लावंड, संजय गायकवाड, संजय मदने, प्रदीप गुरव आणि ग्रामस्थ उपस्थित होते.

## कारंडवाडीत तरुणाच्या दिशेने गोळीबार

पान १ वरुन

अचानक झालेल्या गोळीबारामुळे परिसरात घबराट पसरली. आवाज ऐकून ग्रामस्थांनी घटनास्थळी धाव घेतली. त्यांनी संशयिताला पकडून पोलिसांच्या स्वाधीन केले. संबंधित पिस्तूल बेकायदा असल्याचाही आरोप फिर्यादीत करण्यात आला आहे.

या प्रकरणी महेश जालिंदर माने याच्याविरुद्ध भारतीय न्याय संहितेच्या कलम १०९(१), ३५२, ३५१(२), ३५१(३) तसेच शस्त्र अधिनियम १९५९ च्या कलम ३(२५) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. गोळीबारामागील नेमके कारण काय, यासह घटनेचा पुढील तपास पोलीस निरीक्षक तांबे यांच्या मार्गदर्शनाखाली सातारा तालुका पोलीस करीत आहेत.

# बॅलेट पेपरवर निवडणुका घेण्याच्या मागणीसाठी मनसेची स्वाक्षरी मोहीम

## मुख्य निवडणूक आयुक्तांच्या राजीनाम्याचीही मागणी; साजिद आगा यांचा इशारा

**विटा/प्रतिनिधी:–**

महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष राज ठाकरे यांच्या आदेशानुसार आणि सांगली जिल्हाध्यक्ष तानाजीराव सावंत (फायटरसाहेब) यांच्या मार्गदर्शनाखाली कराड रोड येथे बॅलेट पेपरवर निवडणुका घेण्याच्या मागणीसाठी स्वाक्षरी मोहीम राबविण्यात आली. या मोहिमेत मनसेचे पदाधिकारी, महाराष्ट्र सैनिक आणि नागरिक सहभागी झाले.

निवडणूक प्रक्रियेबाबत जनतेच्या मनातील प्रश्न आणि शंका दूर करण्यासाठी आगामी निवडणुका बॅलेट पेपरवर घेण्यात याव्यात, अशी मागणी मनसेच्या वतीने करण्यात आली. तसेच मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांच्या राजीनाम्याची मागणी करत प्रशासनाच्या भूमिकेचा निषेध नोंदविण्यात आला.

निवडणूक प्रक्रियेवरील जनतेचा विश्वास अधिक दृढ करण्यासाठी मतदानाची पारंपरिक पद्धत पुन्हा लागू करावी, अशी भूमिका मनसेच्या पदाधिकाऱ्यांनी यावेळी मांडली. या मागणीसाठी स्वाक्षरी मोहीम राबवून नागरिकांचा पाठिंबा मिळविण्याचा प्रयत्न करण्यात आला.

बॅलेट पेपरवर निवडणुका झाल्याच पाहिजेत; अन्यथा महाराष्ट्र नवनिर्माण सेना गप्प बसणार नाही, असा इशारा मनसेचे तालुकाध्यक्ष साजिद आगा यांनी दिला. या मागणीसाठी आगामी काळातही पाठपुरावा सुरू ठेवण्याचा निर्धार त्यांनी व्यक्त केला.

या मोहिमेत तालुकाध्यक्ष साजिद आगा, अपुल बुधावले, धनाजी मुळीक, दीपक हराळे, चैतन्य गायकवाड, प्रवीण कदम यांच्यासह अन्य पदाधिकारी, कार्यकर्ते आणि महाराष्ट्र सैनिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. स्वाक्षरी मोहिमेच्या माध्यमातून मनसेने बॅलेट पेपरवर निवडणुका घेण्याच्या मागणीसाठी आपली भूमिका स्पष्ट केली.



# किसन बल्लाळ यांचे निधन

**ईश्वरपूर / प्रतिनिधी:–**



कापूसखेड (ता.वाळवा) येथील ह.भ.प. किसन आबा बल्लाळ (वय ९०) यांचे वार्धक्याने निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, विवाहित दोन मुले,तीन मुली,सुना,नातवंडे असा परिवार आहे. मातंग समाज संघटने चे प्रमुख कार्यकर्ते संजय बल्लाळ,अशोक बल्लाळ (टेलर) यांचे ते वडील होत.


**महापारेषण**
महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनी मर्यादित

**ई–निविदा सूचना**

अउदा संवसु विभाग कराड या कार्यालयांतर्गत **Bi-annual contract for the work of Oil Filtration of ICT/ Power T/Fs at various S/Stn. under EHV O&M Dn Karad** सदरचे काम करण्याकरिता नोंदणीकृत कंत्राटदारांकडून निविदा मागविणेत येत आहेत. निविदेचा **आर. एफ. एक्स. क्रमांक ७००००४१७६२,** नोंदणीकृत कंत्राटदार विहीत नमुन्यातील कोरी निविदा प्रत **https://srmetender.mahatransco.in** या वेबसाईटवरुन डाऊनलोड करुन घेवू शकतील.

**१) कोरी निविदा डाऊनलोड करणेची मुदत :–** १४.१०.२०२६ ते २३.१०.२०२६ **२) निविदा स्वीकारणेची अंतिम तारीख व वेळ :–** २३.१०.२०२६ रोजी २३.५९.०० वाजेपर्यंत. **३) निविदा उघडणेची तारीख व वेळ :– टेक्नीकल बीड** दि. २४.१०.२०२६ रोजी १०.१५ वाजता व **कमर्शिअल बीड** दि. २४.१०.२०२६ रोजी १६.०० वाजता.

जादा माहितीसाठी **www.mahatransco.in** या वेबसाईटवर पहावे. कोणतेही कारण न दाखविता एखादी अथवा सर्व निविदा नाकारण्याचा हक्क खाली सही करणार यांनी राखून ठेवला आहे.

**कार्यकारी अभियंता**
**अउदा संवसु विभाग, कराड**


# दुष्काळाच्या पार्श्वभूमीवर सातारा पालिकेचे पाणी बचतीचे नियोजन

पान १ वरुन

जिल्ह्यात दुष्काळाचे सावट गडद होत असताना पाण्याच्या उपलब्धतेचे नियोजन करणे हे पालिका प्रशासनासमोरील महत्त्वाचे आव्हान ठरत आहे. जिल्हा प्रशासनाच्या दहा टक्के पाणीकपातीच्या आदेशाच्या पार्श्वभूमीवर शहरातील नागरिकांना पिण्याचे पाणी उपलब्ध करून देताना पाण्याचा अपव्यय टाळण्याची गरज अधोरेखित झाली आहे. त्यासाठी पाणीपुरवठा यंत्रणेतील गळती शोधून ती तातडीने दुरुस्त करणे, वितरण व्यवस्थेवर लक्ष ठेवणे आणि उपलब्ध पाणीसाठ्याचा काटेकोर वापर करणे या उपाययोजनांवर भर देण्याची भूमिका बैठकीत मांडण्यात आली.

दरम्यान, नागरिकांनीही पाणी बचतीची जबाबदारी स्वीकारण्याची आवश्यकता आहे. घरगुती वापरात पाण्याचा अपव्यय टाळणे, नळ सुरू ठेवून पाणी वाया जाऊ न देणे आणि पाणीगळती निदर्शनास आल्यास पालिकेला कळविणे, अशा उपायांतून पाणी बचतीच्या प्रयत्नांना हातभार लागू शकतो.

दुष्काळी परिस्थितीचे गांभीर्य लक्षात घेता केवळ बैठका घेण्यापुरते नियोजन मर्यादित न राहता त्याची प्रत्यक्ष अंमलबजावणी किती प्रभावीपणे होते, यावर शहराचा पाणीपुरवठा अवलंबून राहणार आहे. त्यामुळे पाणीकपातीच्या आदेशाची अंमलबजावणी, गळती रोखण्यासाठीची कार्यवाही आणि भविष्यातील पाणीटंचाईचा सामना करण्यासाठीचे नियोजन याबाबत पालिका प्रशासनाला सातत्याने आढावा घ्यावा लागणार आहे.

१ . हेल्पलाईन संपर्क तातडीने गळती निघणार २ विद्युत मोटरींचा वापर केल्यास कारवाई अनधिकृत कनेक्शनचा घेतला जाणार आढावा ३ .वारंवार होणाऱ्या खंडित वीज पुरवठ्यामुळे एम एस सी बी ला सूचना स्वतंत्र वीज यंत्रणा उभारण्याच्या तयारीचा आढावा . ४ . पाणी वाया गेल्यास घंटेवारी योग्य न झाल्यास होणार कारवाई ५. शनिवार पेठ सोमवार पेठ करंजे तसेच कमी दाबाने पाणीपुरवठा होणाऱ्या भागांवर राहणार विशेष लक्ष ६. गाडी अथवा रस्ते धुणे इमारतीवर पाणी मारणे आढळल्यास होणार कारवाई

**जिल्हा- सातारा** **जिल्हाधिकारी यांजकडून**

**भूमीसंपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ व सन २०१८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ९७ नुसारच्या (महाराष्ट्र सुधारणा) अधिनियम २०१८ अन्वये कलम १९ पोटकलम (१) अन्वयेचे**

## घोषणापत्र

क्रमांक भूसंपादन / एसआर-९०८/२०२२ ज्याअर्थी, समुचित शासन असलेल्या सातारा जिल्हयाच्या जिल्हाधिकारी यांचे मार्फत भूसंपादन अधिनियमातंर्गत जिल्हाधिकारी यांची कार्ये पार पाडण्यासाठी नियुक्त उपजिल्हाधिकारी भूसंपादन क्र. ४ सातारा यांनी भूमिसंपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकता हक्क अधिनियम, २०१३ (२०१३ चा ३०) (यात यापुढे ज्याचा निर्देश उक्त अधिनियम असा केला आहे.) याच्या कलम ११ च्या पोट-कलम (१) द्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करुन, अधिसूचना, क्रमांक ११, महाराष्ट्र शासन राजपत्र भाग एक, पुणे विभागीय पुरवणी मध्ये दि. ३१ ऑक्टोबर ते ६ नोव्हेंबर, २०२४ रोजी पृष्ठ १ ते ३ अन्वये प्रारंभिक अधिसूचना काढली आहे आणि त्याद्वारे असे अधिसूचित केले आहे की, यासोबत जोडलेल्या अनुसूची एकमध्ये अधिक तपशीलवार वर्णन केलेल्या जमिनीची, अनुसूची दोनमध्ये अधिक तपशीलवार विनिर्दिष्ट केलेल्या सार्वजनिक प्रयोजनासाठी आवश्यकता आहे किंवा तिची आवश्यकता भासण्याची शक्यता आहे;

आणि ज्याअर्थी, जिल्हाधिकारी सातारा यांनी उक्त अधिनियमाच्या कलम १५ च्या पोट-कलम (२) अन्वये दिलेला अहवाल, कोणताही असल्यास, विचारात घेतल्यानंतर उक्त सार्वजनिक प्रयोजनासाठी उक्त जमीन संपादित करण्याची आवश्यकता आहे,याबाबत त्याची खात्री पटली आहे;

आणि म्हणून उक्त अधिनियमाच्या कलम १९ चे पोट-कलम (१) च्या तरतद्दीन्वये, या अधिसूचनेच्या अनुसूची दोनमध्ये नमूद उक्त सार्वजनिक प्रयोजनासाठी या अधिसूचनेच्या अनुसूची एक मध्ये अधिक तपशिलवार वर्णन केलेल्या उक्त जमिनीची आवश्यकता आहे, असे याद्वारे घोषित करण्यात येत आहे;

आणि ज्याअर्थी, अनुसूची तीनमध्ये वर्णन केलेप्रमाणे बाधित व्यक्ती विस्थापित होत नाहीत म्हणून बाधित पूनर्वसन व पुनर्वसाहत योजनेचा सारांश अनुसूची चारमध्ये वर्णन केलेला नाही.

आणि त्याअर्थी, उक्त अधिनियमाच्या कलम ३ च्या खंड (छ) अन्वये, समुचित शासन असलेले जिल्हाधिकारी, उक्त अधिनियमान्वये जिल्हाधिकाऱ्यांची कार्ये पारपाडण्यासाठी उपजिल्हाधिकारी भूसंपादन क्र. ४ भूसंपादन भवन, सदर बझार, सातारा यास पदनिर्देशित करीत आहे.

### अनुसूची–एक

**जमिनीचे वर्णन**

**गाव- भाडळी खुर्द** **तालुका - फलटण** **जिल्हा - सातारा**

| अ.क्र. | गट/ सर्वे क्रमांक | अंदाजित क्षेत्र (/हेक्टर/आर मध्ये) | दिशा | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | पूर्व | पश्चिम | दक्षिण | उत्तर |
| १ | २९४ | ०.१० | गट नं. २९३ | गट नं.२९१ | गट नं.२९१ | गट नं.२९४ |
| एकूण क्षेत्र | | ०.१० | | | | |

### अनुसूची–दोन

**सार्वजनिक प्रयोजनाच्या स्वरूपाबाबत विवरण**

प्रकल्पाचे नांव :- धोम बलकवडी प्रकल्प गाव- भाडळी खुर्द ता. फलटण जि. सातारा

प्रकल्पाचे संक्षिप्त वर्णन :- धोम बलकवडी उजवा कालवा कि.मी. १२५ ते १२६ मौजे भाडळी खुर्द ता. फलटण साठी संपादन.

समाजाला होणारे लाभ:-

अ) धोम बलकवडी प्रकल्पांतर्गत धोम बलकवडी उजवा कालवा कि.मी. १२५ ते १२६ या योजनेद्वारे फलटण तालुक्यातील १२७५० हेक्टर या दुष्काळी क्षेत्रास सिंचन लाभ होणार आहे.

ब) या योजने अंतर्गत फलटण तालुक्यातील अवर्षणग्रस्त गावांना त्याचा लाभ होणार आहे.

क) या योजनेमुळे भाडळी खुर्द ता. फलटण या गावचे क्षेत्र सिंचनाखाली येणार आहे.

### अनुसूची–तीन

**पुनर्वसाहत क्षेत्राचे वर्णन**

**जिल्हा– सातारा, तालुका– फलटण, गाव– भाडळी खुर्द**

**अनुक्रमांक** **भूमापन क्रमांक किंवा गट नंबर** **क्षेत्र (हे. आर.)**

उक्त सार्वजनिक प्रयोजनामुळे बाधित व्यक्ती विस्थापित होत नाहीत. सबब, पुनर्वसाहत क्षेत्राचे वर्णन निरंक असे.

### अनुसूची–चार

**(पुनर्वसन व पुनर्वसाहत योजनेचा सारांश)**

**पुनर्वसन व पुनर्वसाहत क्षेत्राचे वर्णन निरंक असे**

टीप - उक्त जमिनीच्या आराखड्यांचे उपजिल्हाधिकारी भूसंपादन क्र. ४ सातारा, पत्ताः- भूमीसंपादन भवन, सदर बझार, सातारा या कार्यालयात निरीक्षण करता येईल.

दिनांक : २७/०८/२०२६

ठिकाण : सातारा

**सही/-**
**(अभिषेक देशमुख)**
**उपजिल्हाधिकारी**
**भूसंपादन क्र. ४ सातारा**

**सही/-**
**(संतोष पाटील)**
**जिल्हाधिकारी, सातारा**

जिमाका/सातारा/जा/१९५/२०२६-२७

# मनाच्या आरोग्यासाठी आत्मस्वीकार आवश्यक

## डॉ. सोनाली खाडे ; 'शोध मनाच्या अस्तित्वाचा' विषयावर दुसरे पुष्प, कमी आत्मविश्वास ही कायमस्वरूपी अवस्था नसते

**कराड/प्रतिनिधी : –**

नकारात्मक विचार, मनावरील ताण आणि कमी आत्मविश्वास यांचा परिणाम आपल्या जगण्यावर होत असतो. मात्र, स्वतःला समजून घेऊन भावनांचा स्वीकार केला, तर आयुष्य अधिक आनंदी बनवता येते. चुका स्वीकारून त्यातून शिकणे, स्वतःवर प्रेम करणे आणि इतरांबद्दल कृतज्ञता बाळगणे आवश्यक आहे, असे प्रतिपादन प्रसिद्ध मानसशास्त्रज्ञ व संमोहनतज्ज्ञ डॉ. सोनाली खाडे यांनी केले.

कराड नगरपालिका नगरवाचनालयाच्या वतीने यशवंतराव चव्हाण सभागृहात आयोजित ९४ व्या शारदीय व्याख्यानमालेत 'शोध मनाच्या अस्तित्वाचा' या विषयावरील दुसरे पुष्प गुंफताना त्या बोलत होत्या. यावेळी उपनगराध्यक्ष प्रतापराव साळुंखे, नगरसेविका नीलम कदम, माजी नगरसेवक सौरभ पाटील, प्रा. बी. एस. खोत, ग्रंथपाल महेंद्र लोखंडे आणि सहाय्यक ग्रंथपाल सायली फल्ले उपस्थित होते.

**शारदीय व्याख्यानमाला दुसरे पुष्प**

मनाचे स्वरूप उलगडताना डॉ. खाडे म्हणाल्या, की माणसाच्या विचारांवर त्याचे वातावरण, बालपणीचे अनुभव आणि कुटुंबातून मिळालेले संस्कार यांचा प्रभाव असतो. त्यामुळे स्वतःच्या विचारांचे निरीक्षण करून मनातील नकारात्मकता ओळखणे महत्त्वाचे आहे. आपण स्मार्टफोनमधील प्रत्येक गोष्ट जाणून घेण्याचा प्रयत्न करतो; मात्र वर्षानुवर्षे वापरत असलेल्या स्वतःच्या शरीराविषयी आणि मनाविषयी पुरेशी जाणीव ठेवत नाही. स्वतःला समजून घेतल्यास दुःखाची कारणे ओळखून त्यावर मात करता येते. लहानपणी मनावर झालेले संस्कार आणि नकारात्मक अनुभवांमुळे असुरक्षितता, चिडचिड, न्यूनगंड व अपराधीपणाची भावना निर्माण होऊ शकते. कमी आत्मविश्वास ही कायमस्वरूपी अवस्था नसते. स्वतःतील कमतरता स्वीकारून बदलाची सुरुवात केली, तर परिस्थिती बदलू शकते. चुका प्रत्येकाकडून होतात; मात्र त्यातून शिकून त्या दुरुस्त करण्याची तयारी असली पाहिजे.



कराड नगरपालिका नगरवाचनालयाच्या वतीने आयोजित ९४ व्या शारदीय व्याख्यानमालेत 'शोध मनाच्या अस्तित्वाचा' या विषयावर बोलताना प्रसिद्ध मानसशास्त्रज्ञ व संमोहनतज्ज्ञ डॉ. सोनाली खाडे, आणि समोर उपनगराध्यक्ष प्रतापराव साळुंखे, नगरसेविका नीलम कदम, माजी नगरसेवक सौरभ पाटील इतर

कोणत्या गोष्टींचा किती ताण घ्यायचा, हेही ठरवता आले पाहिजे, असे त्यांनी सांगितले.

समाजातील भावनिक अभिव्यक्तीविषयी बोलताना त्यांनी पुरुषांनीही आपल्या भावना मोकळेपणाने व्यक्त करण्याची गरज अधोरेखित केली. रडणे हे कमजोरीचे लक्षण मानणे चुकीचे आहे. भावनांचा स्वीकार आणि त्यांचा समतोल राखणे मानसिक स्वास्थ्यासाठी आवश्यक आहे. सोशल मीडियामुळे निर्माण झालेल्या तुलनेच्या आणि स्पर्धेच्या वातावरणात प्रत्येक लढाई जिंकण्याचा अट्टहास न करता स्वतःच्या आनंदाला महत्त्व द्यावे, असेही त्यांनी नमूद केले.

प्रेमाची सुरुवात स्वतःपासून झाली पाहिजे. स्वतःच्या आणि इतरांच्या चुका माफ करून नव्याने सुरुवात करावी. यश मिळाल्यानंतर गर्व न करता आपल्या वाटचालीत योगदान देणाऱ्या माणसांना सोबत घेऊन पुढे जावे. गौतम बुद्धांच्या विचारांचा संदर्भ देत त्यांनी कृतज्ञता, त्याग आणि देण्याची वृत्ती जोपासण्याचे आवाहन केले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. डॉ. विजया पवार यांनी केले. ऐश्वर्या पाटणकर यांनी मान्यवरांचा परिचय करून दिला, तर अनिल थोरात यांनी सूत्रसंचालन करून आभार मानले.

### बंद दरवाजानंतरही संधी असते!

व्याख्यानादरम्यान डॉ. सोनाली खाडे यांनी उपस्थितांना डोळे मिटून आयुष्यात मिळालेल्या गोष्टींबद्दल कृतज्ञता व्यक्त करण्यास सांगितले. परमेश्वराकडे केवळ सुख-संपत्ती नव्हे, तर दुसऱ्यांना मदत करण्याची दानत, चांगला माणूस बनण्याची वृत्ती, बुद्धिमत्ता आणि आत्मविश्वास मागा, असे आवाहन त्यांनी केले. एखादा दरवाजा बंद झाला, तर दहा खिडक्या उघडतात; फक्त योग्य संधी ओळखून ती स्वीकारता आली पाहिजे, या संदेशातून त्यांनी सकारात्मक दृष्टिकोनाचे महत्त्व पटवून दिले. त्यांच्या मार्गदर्शनाला उपस्थित श्रोत्यांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.

# दुष्काळाचे सावट ; शाही सीमोल्लंघन सोहळ्याला साधेपणाची किनार

**सातारा/प्रतिनिधी:–**



राज्यातील दुष्काळी परिस्थिती आणि पाणीटंचाईचे वाढते संकट लक्षात घेऊन साताऱ्यातील जलमंदिर पॅलेस येथे होणारा ऐतिहासिक शाही विजयादशमी सीमोल्लंघन सोहळा यंदा साधेपणाने साजरा करण्याचा निर्णय खासदार उदयनराजे भोसले यांनी घेतला आहे. उत्सवाच्या निमित्ताने अनावश्यक खर्च, बॅनरबाजी आणि दिखाऊपणा टाळून दुष्काळग्रस्त शेतकरी व नागरिकांना मदतीचा हात द्यावा, असे आवाहन त्यांनी केले आहे.

साताऱ्याच्या ऐतिहासिक आणि सांस्कृतिक परंपरेशी जोडलेल्या या सोहळ्याला विशेष महत्त्व आहे. श्री भवानी तलवारीचे पूजन, शाही पालखी मिरवणूक, पोवई नाक्यावरील ऐतिहासिक वेशीचे पूजन आणि जलमंदिर पॅलेस येथे मिरवणुकीचे स्वागत, औक्षण व पूजनानंतर आपट्याचे सोने स्वीकारण्याची परंपरा यंदाही कायम राहणार आहे. मात्र, उत्सव साजरा करताना परिस्थितीचे भान राखण्यावर उदयनराजे यांनी भर दिला आहे.

राज्यातील अनेक भागांत पावसाने ओढ दिल्याने पाणीटंचाई तीव्र झाली आहे. शेतीसमोरील आर्थिक अडचणी वाढल्या असून, पशुधनाचे संगोपन करणेही शेतकऱ्यांसाठी आव्हानात्मक ठरत आहे.

अशा वेळी मोठ्या प्रमाणावर खर्च करून उत्सव साजरा करण्यापेक्षा गरजूंच्या मदतीसाठी संसाधने वापरणे अधिक महत्त्वाचे असल्याची भूमिका त्यांनी मांडली.

### दुष्काळग्रस्तांच्या मदतीसाठी पुढाकार घ्या

वैयक्तिक तसेच सार्वजनिक जीवनातील अनावश्यक खर्च कमी करून दुष्काळग्रस्तांना मदत करण्यासाठी सर्वांनी पुढे यावे. प्रत्येकाने आपल्या क्षमतेनुसार योग्य पद्धतीने मदत केल्यास संकटाचा सामना करणाऱ्या शेतकरी कुटुंबांना आणि नागरिकांना आधार मिळू शकतो, असे उदयनराजे यांनी प्रसिद्धीपत्रकात म्हटले आहे.

# ऊसाला प्रतिटन साडेपाच हजार रुपये दर द्या

## शेतकरी संघटनांचा इशारा ; मागणी मान्य न झाल्यास १८ ऑक्टोबरला तांबवे फाटा येथे रास्ता रोको

**कराड/प्रतिनिधी : –**

ऊसाला प्रतिटन साडेपाच हजार रुपये दर जाहीर करावा, या मागणीसाठी शेतकरी कामगार पक्ष, बळीराजा शेतकरी संघटना, राष्ट्रीय समाज पक्ष आणि यशवंत संघटना आक्रमक झाल्या आहेत. मागणी मान्य न झाल्यास रविवारी (दि. १८) दुपारी चार वाजता तांबवे फाटा, ता. कराड येथे रास्ता रोको आंदोलन करण्याचा इशारा या संघटनांनी तहसीलदारांना निवेदनाद्वारे दिला आहे.

यंदा दुष्काळसदृश परिस्थितीमुळे उसाचे उत्पादन आणि साखर उतारा घटण्याची शक्यता आहे. त्यातच खते, नांगरट आणि अन्य मशागतींचा खर्च वाढल्याने शेतकरी आर्थिक संकटात सापडला आहे. अशा परिस्थितीत साखर कारखाने ऑक्टोबरमध्येच सुरू करण्याची घाई का, असा सवाल शेकापचे जिल्हाध्यक्ष ॲड. भाई समीर देसाई यांनी केला. साखरेच्या वाढलेल्या बाजारभावाच्या पार्श्वभूमीवर



शेतकऱ्यांना प्रतिटन साडेपाच हजार रुपये दर मिळावा, अशी मागणी त्यांनी केली. बळीराजा शेतकरी संघटनेचे जिल्हाध्यक्ष चंद्रकांत यादव यांनीही कारखान्यांच्या लवकर सुरू होण्यावर आक्षेप घेतला. शेतकरी संघटनांशी चर्चा न करता कारखाने सुरू करण्यात आले असून, दर जाहीर करण्यापूर्वीच ऊसतोड सुरू झाली आहे. उत्पादन खर्च वाढलेला असताना शेतकऱ्यांना योग्य दर मिळणे आवश्यक आहे. त्यामुळे कारखान्यांनी प्रतिटन ५,५०० रुपये दर जाहीर करावा; अन्यथा आंदोलन तीव्र केले जाईल, असा इशारा त्यांनी दिला.

यावेळी रासपचे जिल्हा कार्याध्यक्ष महेश जिरंगे, शिवाजीराव पाटील (सुपणेकर), ॲड. भाई हैबतराव पवार, ॲड. अमित लाड, संदीप साळुंखे, सुनील कोळी, सर्जेराव थोरात, प्रल्हाद माने, भाई विक्रम पाटील यांच्यासह विविध शेतकरी संघटनांचे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

# आ.पडळकर यांचा अर्ज बाद ; ईश्वरपूरात राष्ट्रवादी काँग्रेस (श.प.)पक्षाच्या कार्यकर्त्यांची फटाक्यांची अतिषबाजी

**ईश्वरपूर / प्रतिनिधी:–**

राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या कार्यकर्त्यांनी उरुण ईश्वरपूर येथील कचेरी चौकात फटाक्यांची अतिषबाजी आणि घोषणांच्या निनादात आ.गोपीचंद पडळकर यांचा सांगली जिल्हा मध्यवर्ती बँकेच्या निवडणुकीतून उमेदवारी अर्ज बाद झाल्याचा आनंदोत्सव जोरदार साजरा केला. उमेदवारी अर्ज भरताना आ.पडळकर यांच्या कार्यकर्त्यांनी दिलेल्या उलट-सुलट घोषणा आणि यावेळी आ.पडळकर यांनी माजी मंत्री आ. जयंतराव पाटील यांच्यावर केलेल्या टिकेची प्रतिक्रिया म्हणून हा आनंदोत्सव साजरा केल्याची चर्चा होती. बाप तो बाप रहता है,याचे भान त्यांनी ठेवावेअशी प्रतिक्रिया पदाधिकाऱ्यांनी व्यक्त केली.

जतचे भाजपा आ.गोपीचंद



उरुण ईश्वरपूर येथे फटाक्यांची अतिषबाजी आणि घोषणांच्या निनादात आ. गोपीचंद पडळकर यांचा उमेदवारी अर्ज बाद झाल्याचा आनंदोत्सव साजरा करताना राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे पदाधिकारी व कार्यकर्ते.

पडळकर यांनी सांगली जिल्हा मध्यवर्ती बँकेसाठी उमेदवारी अर्ज भरला होता. हा भरताना त्यांच्या कार्यकर्त्यांनी दिलेल्या उलट-सुलट घोषणा आणि आ.पडळकर यांनी यावेळी आ.जयंतराव पाटील यांच्यावर केलेल्या टिकेमुळे वाळवा तालुक्यातील कार्यकर्त्यां मध्ये अस्वस्थता आली होती. मात्र आज कोल्हापूर खंडपिठाने आ.पडळकर यांचा अर्ज अवैध्य ठरविल्यानंतर उरुण ईश्वरपूर, आष्टा शहरासह वाळवा तालुक्यातील कार्यकर्त्यांनी आनंदोत्सव साजरा केला. यावेळी आ.जयंतराव पाटील व राष्ट्रवादी काँग्रेसच्या नावाने जोरदार घोषणा देण्यात आल्या. सोशल मिडियाच्या माध्यमातूनही वेग वेगळ्या पोस्टचा धमाका उडविण्यात आला आहे.

याप्रसंगी राष्ट्रवादीचे राज्य सरचिटणीस अरुण कांबळे, कारखान्याचे संचालक शैलेश पाटील, न. पा.सभापती संदीप माने, महिला शहराध्यक्षा पुष्पलता खरात, प्रदेश सदस्या कमल पाटील, बाजार समितीचे संचालक अनिल पावणे, पदवीधर चे राज्य उपाध्यक्ष विशाल सुर्यवंशी, तालुकाध्यक्ष अभिजित शिंदे, युवकचे शहराध्यक्ष दिग्विजय पाटील, सोशल मीडियाचे शहराध्यक्ष अभिमन्यू क्षीरसागर, बाळासाहेब कोळेकर, अक्षय कोळेकर, परेश पाटील, मालन वाकळे, मनिषा पेठकर, योगिता माळी, सुनंदा साठे, प्रियांका साळुंखे, अंकुश जाधव, सागर पोतदार, विकास चौगुले, दीपक अडसूळ, सुशांत कोळेकर, सुहास पाटील, महादेव जाधव यांच्यासह पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते

# महाडिक संकुलात भाजप महायुतीचा शिक्षक-पदवीधर मेळावा उत्साहात

**ईश्वरपूर /प्रतिनिधी:–**

आगामी पुणे पदवीधर मतदारसंघ आणि शिक्षक मतदारसंघाच्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर भारतीय जनता पक्ष महायुतीच्या उमेदवारांच्या प्रचारार्थ पेठ नाका येथील नानासाहेब महाडिक शैक्षणिक संकुलात शिक्षक व पदवीधर मेळावा उत्साहात पार पडला. या मेळाव्याच्या माध्यमातून शिक्षक आणि पदवीधर मतदारांशी संवाद साधत महायुतीच्या उमेदवारांना मोठ्या मताधिक्याने विजयी करण्याचे आवाहन करण्यात आले. या मेळाव्याला शिक्षक, पदवीधर, भाजप पदाधिकारी, कार्यकर्ते आणि विविध क्षेत्रांतील मान्यवरांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.

पदवीधर मतदारसंघाच्या उमेदवार डॉ. स्मितताई जाधव म्हणाल्या, पदवीधर तरुणांच्या हाताला काम, त्यांच्या कौशल्याला योग्य संधी आणि शिक्षणाला रोजगाराभिमुख दिशा मिळणे ही आजच्या काळाची गरज आहे.राहुलदादा महाडिक आणि सम्राटबाबा महाडिक यांच्यासारख्या स्थानिक नेतृत्वाने दिलेले पाठबळ आमच्यासाठी निश्चितच महत्त्वाचे आहे. त्यांच्या माध्यमातून मिळणारा कार्यकर्त्यांचा संपर्क आणि संघटनात्मक सहकार्य प्रचाराला नवी ऊर्जा देणारे आहे.

शिक्षक मतदारसंघाचे उमेदवार कौस्तुभ गावडे म्हणाले, शिक्षक हा समाजाच्या जडणघडणीतील सर्वांत महत्त्वाचा घटक आहे. शिक्षकांच्या समस्या समजून घेणे, त्यांच्या मागण्यांना योग्य व्यासपीठ मिळवून देणे आणि शैक्षणिक क्षेत्रातील अडचणी सोडविण्यासाठी सातत्याने प्रयत्न करणे ही माझी प्राथमिकता राहील.

यावेळी बोलताना राहुलदादा महाडिक म्हणाले, शिक्षक आणि पदवीधर हे समाजाला दिशा देणारे महत्त्वाचे घटक आहेत. त्यांच्या अपेक्षा आणि प्रश्न समजून घेऊन त्यांना योग्य प्रतिनिधित्व मिळणे आवश्यक आहे. या निवडणुकीत महायुतीच्या



उमेदवारांच्या विजयासाठी सर्व पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांनी एकदिलाने काम करावे.

भाजपचे सांगली जिल्हाध्यक्ष सम्राटबाबा महाडिक म्हणाले, भारतीय जनता पक्षाचे संघटन आणि महायुतीच्या कार्यकर्त्यांची एकजूट ही आपली मोठी ताकद आहे. निवडणुकीत यश मिळवण्यासाठी प्रत्येक कार्यकर्त्याने आपली जबाबदारी ओळखून काम केले पाहिजे.

या मेळाव्याच्या निमित्ताने सांगली जिल्ह्यातील महायुतीच्या संघटनात्मक तयारीला महत्त्व प्राप्त झाले. राहुलदादा महाडिक आणि सम्राटबाबा महाडिक यांचा स्थानिक पातळीवरील जनसंपर्क, कार्यकर्त्यांशी असलेला समन्वय आणि राजकीय क्षेत्रातील सक्रियता यामुळे दोन्ही उमेदवारांच्या प्रचाराला बळ मिळण्याची अपेक्षा व्यक्त करण्यात आली.

शिक्षक आणि पदवीधर मतदारसंघाच्या निवडणुकीत उमेदवारांचे वैयक्तिक संपर्क, संघटनात्मक नियोजन आणि मतदारांशी थेट संवाद हे घटक महत्त्वाचे ठरणार आहेत. या पार्श्वभूमीवर महाडिक बंधूंची भूमिका आणि त्यांच्यामागे उभे असलेले कार्यकर्त्यांचे जाळे महायुतीसाठी महत्त्वाचे ठरू शकते. मेळाव्यात उपस्थित पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी दोन्ही उमेदवारांच्या प्रचारासाठी सक्रिय सहभाग नोंदविण्याचा निर्धार व्यक्त केला.

या प्रसंगी ज्येष्ठ नेते स्वरूपराव पाटील, भाजप नेते प्रसाददादा पाटील, जयराजदादा पाटील, वाळवा मंडलाध्यक्ष अर्जुन साळुंखे, आष्टा मंडलाध्यक्ष अमोल पडळकर, ईश्वरपूर मंडलाध्यक्ष संदीपराज पवार, पंचायत समिती सदस्य शुभम पाटील व समर्थ पाटील, प्रदीप कांबळे, माजी नगरसेवक सतीशदादा महाडिक, नगरसेवक अमित ओसवाल, चेतन शिंदे, केदार नलवडे, राजवर्धन पाटील, विजय पाटील, संदीप पाटील, प्रणित कागले, डॉ. व्ही. एस. पाटील, रणजित जाधव, शंकर पाटील, राहुल पाटील यांच्यासह अन्य मान्यवर, शिक्षक, पदवीधर आणि कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.पेठ मंडलाध्यक्ष डॉ.सचिन पाटील यांनी सूत्रसंचालन केले.

महाडिक बंधूंच्या पाठबळामुळे प्रचाराला बळ राहुलदादा महाडिक आणि सम्राटबाबा महाडिक यांची निवडणुकीतील भूमिका महत्त्वाची.शिक्षक व पदवीधर मतदारांशी थेट संवाद साधण्यावर भर. 'महाडिक पॅटर्न'च्या संघटनात्मक ताकदीचा प्रचारात उपयोग करण्याचा निर्धार.

# ईश्वरपूर पोलिसांची कामगिरी ; गहाळ झालेले १८ लाख ४० हजारांचे मोबाईल मूळ मालकांना परत

**ईश्वरपूर /प्रतिनिधी:–**

शहर व परिसरातून विविध गर्दीच्या ठिकाणांवरून गहाळ झालेले तब्बल १८ लाख ४० हजार रुपये किमतीचे १०४ मोबाईल शोधून काढण्यात ईश्वरपूर पोलिसांच्या गुन्हे प्रकटीकरण शाखेला यश आले आहे. अपर पोलीस अधीक्षक कल्पना बारवकर यांच्या हस्ते हे सर्व मोबाईल त्यांच्या मूळ मालकांना परत करण्यात आले.

ईश्वरपूर हे सांगली जिल्ह्यातील महत्त्वाचे व्यापारी केंद्र असून परिसरातील नागरिक, नोकरदार आणि विद्यार्थी यांची येथे दररोज मोठी वर्दळ असते. त्यामुळे बसस्थानक, बाजारपेठ आणि प्रवासादरम्यान गर्दीच्या ठिकाणांहून मोबाईल गहाळ होण्याचे प्रमाण वाढले होते. याबाबत नागरिकांनी ईश्वरपूर पोलीस ठाण्यात मोबाईल गहाळ झाल्याच्या नोंदी केल्या होत्या.



पोलीस निरीक्षक संदीप पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली गुन्हे प्रकटीकरण पथकाने तांत्रिक माहितीच्या आधारे सखोल तपास सुरू केला.

या पथकाने तांत्रिक विश्लेषणाच्या आधारे महाराष्ट्र राज्यातील विविध जिल्ह्यांसह इतर राज्यांतून विविध नामांकित कंपन्यांचे तब्बल १०४ मोबाईल हँडसेट शोधून काढले. शोधलेल्या या मोबाईलची एकूण किंमत १८ लाख ४० हजार रुपये आहे. उपविभागीय पोलीस अधिकारी अरुण पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक संदीप पाटील, पोलीस हवालदार कुबेर खोत, अमोल सावंत, दीपक घस्ते, शशिकांत शिंदे आणि विशाल पांगे यांनी ही कारवाई केली.




# कामेरीच्या घरफोडीचा उलगडा

पान १ वरुन

याप्रकरणी ईश्वरपूर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता.

या गंभीर घटनेची दखल घेत सांगलीचे पोलिस अधीक्षक तुषार दोशी, अपर पोलिस अधीक्षक कल्पना बारवकर आणि ईश्वरपूरचे उपविभागीय पोलिस अधिकारी अरुण पाटील यांनी स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखेचे पोलिस निरीक्षक संजीव झाडे व ईश्वरपूरचे पोलिस निरीक्षक संदीप पाटील यांना तपासाच्या सूचना दिल्या.

त्यानुसार स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखेचे सहायक पोलिस निरीक्षक राजेंद्र यादव आणि ईश्वरपूर पोलिस ठाण्याच्या पथकाने संयुक्त तपास सुरू केला. गोपनीय माहितीच्या आधारे १२ ऑक्टोबर २०२६ रोजी पाचवा मैल भागातील माळ चौक परिसरात संशयित प्रवीण राजा शिंदे याला ताब्यात घेण्यात आले. त्याची चौकशी केली असता, त्याने आपल्या अन्य दोन साथीदारांसह कामेरी येथे घरफोडी केल्याची कबुली दिली त्यानंतर पोलिसांनी त्याच्याकडून चोरीच्या गुन्ह्यातील मुद्देमाल जप्त केला. या गुन्ह्यातील संशयित आर्यन कान्हा काळे व अजय बाळासाहेब शिंदे (दोघेही रा. फडताडवाडी, ता. खटाव, जि. सातारा) यांचा शोध सुरू आहे.

अटक केलेला प्रवीण राजा शिंदे हा सराईत गुन्हेगारआहे. त्याच्यावर यापूर्वी सातारा व सांगली जिल्ह्यांत दरोडा, जबरी चोरी, घरफोडी व चोरीचे १५ हून अधिक गुन्हे दाखल असल्याची माहिती पोलिसांनी दिली.

या कारवाईत स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखा आणि ईश्वरपूर पोलिस ठाण्याच्या पथकाने सहभाग घेतला. पुढील तपास ईश्वरपूर पोलिस करीत आहेत.

ही कारवाई पोलिस अधीक्षक तुषार दोशी, अपर पोलिस अधीक्षक कल्पना बारवकर व उपविभागीय पोलिस अधिकारी अरुण पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस निरीक्षक संजीव झाडे, पोलिस निरीक्षक संदीप पाटील, सहायक पोलिस निरीक्षक राजेंद्र यादव, सहायक पोलिस निरीक्षक हरीशचंद्र गवाडे व दोन्ही पथकांतील कर्मचाऱ्यांनी केली.

# ऊसाला प्रतिटन ५ हजार रुपये दर द्या

## अन्यथा ऊस वाहतूक रोखू ; शेतकरी सेनेचे घानवड-गार्डी रस्त्यावर आंदोलन ; २० ते २५ ट्रॅक्टर अडवले

**विटा / प्रतिनिधी:–**

ऊसाला प्रतिटन पाच हजार रुपये दर मिळावा, या मागणीसाठी भक्तराज ठिगळे यांच्या नेतृत्वाखाली शेतकरी सेनेच्या वतीने घानवड-गार्डी रस्त्यावर आंदोलन करण्यात आले. यावेळी यशवंत कारखाना आणि उदगीर कारखान्याकडे ऊस घेऊन जाणारे २० ते २५ ट्रॅक्टर अडवून कारखाना व्यवस्थापनाला इशारा देण्यात आला.

ऊस उत्पादक शेतकऱ्यांना त्यांच्या घामाचा योग्य मोबदला मिळावा, यासाठी शेतकरी सेनेने आक्रमक भूमिका घेतली आहे. ऊसाला प्रतिटन पाच हजार रुपये दर जाहीर करून त्याची अंमलबजावणी होईपर्यंत या मार्गावरून ऊस वाहतूक होऊ दिली जाणार नाही, असा इशारा संघटनेच्या वतीने देण्यात आला. शेतकऱ्यांच्या मागण्यांकडे कारखानदारांनी दुर्लक्ष केल्यास आंदोलन अधिक तीव्र करण्याचा निर्धारही यावेळी व्यक्त करण्यात आला.

दरम्यान, उद्यापासून रस्त्यावर उसाने भरलेल्या ट्रॉल्या आढळल्यास ट्रॅक्टर आणि ट्रॉलींचे मोठ्या प्रमाणात नुकसान केले जाईल, असा इशाराही आंदोलकांनी दिला. त्यामुळे परिसरातील ऊस वाहतुकीचा प्रश्न ऐरणीवर आला असून, कारखाना व्यवस्थापन यावर काय भूमिका घेणार, याकडे शेतकरी आणि ऊस वाहतूकदारांचे लक्ष लागले आहे.



या आंदोलनात देवा भाऊ मोहिते, संभाजी अण्णा निकम, अमित रावताळे, महादेव कदम, मोहन पवार, बाळासो मोहिते, हनुमंत निकम, रमेश मोहिते, गोरख साळुंखे, किरण इनामदार, वासुदेव निकम, सचिन निकम, अधिक कदम, सुहास कुंभार, सूरज कदम, उद्धव रावताळे आणि आनसर शेख यांच्यासह शेतकरी सेनेचे कार्यकर्ते सहभागी झाले होते.